ePaper

# पाकिस्तानला उघडपणे पाठिंबा देणं तुर्कीला भोवलं, आर्थिक नाड्या आवळल्या!

| वर्ष - 8 | अंक - 280 | UDYAM-MH-26-0158827 |



महाईन्यूज ™

## आतील पानांत


- अष्टपैलू रवींद्र जडेजाचा वर्ल्ड रेकॉर्ड
- ...खेळाडूचा भारतात परतण्यास नकार!
- बलुचिस्तान पाकिस्तानचा भाग नाही
- तेलंगणा सीमेवर ३१ नक्षलवादी ठार


www.mahaenews.com | गुरुवार, दि. 15 मे 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## पाकने दयेची भीक मागितली, म्हणून युद्ध थांबले

# जागतिक लष्करतज्ज्ञांच्या मते, भारताचा ‘क्लियर कट’ विजय !

## भारतात शोपियानमध्ये शस्त्रास्त्रांचा मोठा साठा जप्त, पाकड्यांचे कंबरडेच मोडले!

| नवी दिल्ली / इस्लामाबाद
| प्रतिनिधी | महाईन्यूज

**भारताने पुकारलेल्या ‘ऑपरेशन सिंदूर’ ला काही प्रमाणात विराम मिळाला असला तरी पाकड्यांच्या कुरघोड्या सुरूच आहेत. शोपियान परिसरात बुधवारी रात्री झालेल्या चकमकीमध्ये भारतीय लष्कराने तीन कट्टर दहशतवाद्यांचा खात्मा केला, तर प्रचंड प्रमाणावर शस्त्रास्त्रांचा साठाही जप्त केला. यामुळे पाकिस्तानचे कंबरडे मोडले आहे**



### मोदींच्या इशाऱ्यानंतर पाकडे हादरले! दहशतवाद उखडून काढण्याची प्रतिज्ञा..

दरम्यान, पाकिस्तानने दयेची भीक मागितल्यामुळे तात्पुरता युद्धविराम झाला आहे. पण, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दहशतवाद्यांना उखडून काढण्याचा इशारा दिला असल्याने पाकिस्तान हादरला आहे. या पार्श्वभूमीवर, दोन जागतिक लष्करतज्ज्ञांनी जाहीर करून टाकले, की हा भारताचा ‘क्लियर कट’ विजय आहे.

### ऑस्ट्रेलिया, अमेरिकेची शाबासकी!

‘ऑपरेशन सिंदूर’ नंतर ऑस्ट्रेलियन आणि अमेरिकन लष्करीतज्ज्ञांनी भारताच्या स्पष्ट विजयाची पुष्टी केली आहे. त्यांनी भारतीयांना शुभेच्छा देऊन शाबासकीही दिली आहे.

### पाकिस्तानचे लोटांगण..

पाकनेच युद्धविरामासाठी भीक मागितल्याचे या दोन्ही तज्ज्ञांनी नमूद केले आहे. भारताने पाकिस्तानातील दहशतवादी अड्डयांवर केलेल्या अचूक हल्ल्यामुळे पाकची संरक्षण यंत्रणा निष्क्रिय ठरल्याचेही या तज्ज्ञांनी स्पष्ट केले आहे.

### पाकड्यांचा करेक्ट कार्यक्रम..

‘ऑपरेशन सिंदूर’ नंतर चवताळलेल्या पाकिस्तानने खोट्या बातम्या पसरवण्यास सुरुवात केली आहे. खोटी माहिती देऊन दिशाभूल करण्याचे सध्या युद्धपातळीवर काम सुरू आहे. मात्र, ऑस्ट्रेलियन लष्कर तज्ज्ञ टॉम कूपर आणि अमेरिकेचे युद्ध तज्ज्ञ जॉन स्पेन्सर यांनी पाकिस्तानच्या शाहबाज शरीफ सरकारचा बुरखा फाडला आहे. या दोन्ही लष्करतज्ज्ञांनी तीन चार दिवस चाललेल्या कारवाईत भारताचाच स्पष्ट विजय झाल्याचा दावा केला आहे. भारताने पाकिस्तानचा ‘करेक्ट कार्यक्रम’ केल्याचे त्यांनी म्हटले आहे.

### पाकिस्तानला रांगायला लावले..

पाकिस्तानने शस्त्रसंधीसाठी भारताला केविलवाणेपणाने साकडे घातले. त्यात काही नवीन नव्हते. कारण पाकिस्तानचे एवढे नुकसान झाले होते, की त्यामुळे पाकिस्तान घाबरला होता, टाहो फोडून रांगायला लागला होता. त्यामुळेच शस्त्रसंधी करण्याशिवाय पाककडे पर्याय उरला नव्हता, असे या दोन्ही तज्ज्ञांनी म्हटले आहे.

### युद्ध विशेषज्ज्ञांच्या मते..

टॉम कूपर हे जगातील सर्वात सन्माननीय युद्ध विशेषज्ज्ञ आहेत. युद्ध इतिहासकार आहेत. कूपर हे विश्लेषक, लेखक आणि मध्यपूर्व पासून ते दक्षिण आशियापर्यंतच्या एअर वॉरचे एक्सपर्ट आहेत. एक आठवडा चाललेल्या या घटनाक्रमावर टॉप कूपर यांनी एक ब्लॉग लिहिला असून त्यात आपले स्पष्ट आणि कठोर मत व्यक्त केले आहे.

### पाक आर्मी टिकू शकली नाही..

टॉम कूपर म्हणतात, भारतीय सैन्याच्या समोर पाकिस्तानी आर्मी टिकू शकली नाही. भारताने पाकिस्तानच्या अंतर्गत भागात घुसून ज्या पद्धतीने हा:हाकार माजवला, त्यातून पाकिस्तान पराभूत झाल्याचे दिसून येत आहे. त्यामुळेच युद्धविराम व्हावा, म्हणून पाकिस्तानने अमेरिकेला साकडे घातले, असे सांगतानाच भारताची हा ‘ क्लिअर कट’ विजय असल्याचे कूपर यांनी म्हटले आहे.

### या विजयाचा सरळ अर्थ काय?

हा विजय सरळ सरळ सांगतो, की एक देश दुसऱ्या देशाच्या अण्वस्त्र भंडारावर बॉम्ब फोडत असेल आणि दुसरा देश काहीच करण्याच्या स्थितीत नसेल तर माझ्या मते हा सरळ सरळ विजय आहे. इस्लामाबादकडून युद्धविरामासाठी साकडे घालणे ही काही नवीन गोष्ट नाही, असे कूपर ब्लॉगमध्ये म्हणतात.

### पाकिस्तानने मौन, का ते ओळखा!

भारताची कारवाई पाकपेक्षा किती तरी पटीने मोठी होती.’ऑपरेशन सिंदूर’ मध्ये कमीत कमी पाच म्होरक्या असलेले दहशतवादी मारले गेले. तसेच इतर सुमारे दीडशे दहशतवाद्यांना कंठस्नान घालण्यात आले. यावर पाकिस्तानच्या सरकारने मौन बाळगले आहे. पण, आयएसआयने या दहशतवाद्यांना शहीद ठरवून त्यांना पाकिस्तानी सैन्याच्या अधिकारांसोबत राजकीय सन्मान दिला आहे. यावरून दहशतवाद्यांचा पाक सैन्याशी थेट संबंध असल्याचे स्पष्ट होते, असे त्यांनी म्हटले आहे.

### धमक्यांचे गांभीर्य संपले..

‘इंड्स वॉटर ट्रीटी सस्पेन्शन’ मध्ये टॉम कूपर म्हणतात, भारताने पाणी रोखले. पाकिस्तान काहीच करू शकला नाही. खरे तर पाकिस्तानसाठी ही रेड लाईन होती. पाकिस्तानने काहीच धडा घेतला नाही. भारताने पाकिस्तानच्या धमक्या गंभीरपणे घ्यायचे सोडून दिले आहे, हे पाकलाही कळले नाही.

### मोदींच्या नव्या भारताचा नवा विचार!

भारत अण्वस्त्र धमकीला भीक घालत नाही, हे भारताच्या कारवाईतून स्पष्ट झाले आहे. भारत आता दहशतवाद आणि चर्चा दोन्ही गोष्टी एक साथ स्वीकारणार नाही. खून आणि पाणी एक साथ वाहू शकत नाही, हाच नव्या भारताचा सिद्धांत आहे. भारत आता जुन्या युद्धाची नव्हे तर येणाऱ्या युद्धाची तयारी करत आहे, असेही या दोन लष्कर तज्ज्ञांनी म्हटले आहे. या ऑपरेशनचा हेतू बदला घेणे नव्हता. तर भारत आता दहशतवादाच्या विरोधात आक्रमकपणे पुढे जात आहे, हे दाखवणे, हाच होता. भारताने एक झटका सहन केला, लक्ष्य ठरवले आणि ते मिळवले. तेही कमी वेळात आणि मर्यादित सीमारेषेत, असे त्यांनी नमूद केले आहे. भारताने सीमित युद्धाचे उदाहरण घालून दिले आहे. उद्देश स्पष्ट होता. पद्धत स्पष्ट होती आणि नेतृत्व मजबूत होते, असे सांगतानाच जॉन स्पेन्सर यांनी भारताच्या संयमाचे ही कौतुक केले आहे. भारताचा संयम वाखाणण्यासारखा होता असेही या दोन लष्कर तज्ज्ञांनी म्हटले आहे.



ePaper

## पाकिस्तानला उघडपणे पाठिंबा देणं तुर्कीला भोवलं, आर्थिक नाड्या आवळल्या!

वर्ष - 8 । अंक - 280 | UDYAM-MH-26-0158827



महाईन्यूज ™

आतील पानांत


- अष्टपैलू रवींद्र जडेजाचा वर्ल्ड रेकॉर्ड
- ...खेळाडूचा भारतात परतण्यास नकार!
- बलुचिस्तान पाकिस्तानचा भाग नाही
- तेलंगणा सीमेवर ३१ नक्षलवादी ठार


www.mahaenews.com | गुरुवार, दि. 15 मे 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

### 'अजितदादा, शरद पवार, सुप्रिया सुळे एवढाच त्यांचा पक्ष'

# राष्ट्रवादीच्या एकत्रीकरणाची चर्चा!

## अशा चर्चा नेहमीच्याच; भाजप नेते चंद्रकांत पाटील यांचा खोचक टोला

। पुणे । प्रतिनिधी । महाईन्यूज

**पुन्हा एकदा दोन्ही राष्ट्रवादी राष्ट्रवादी अजित पवार गट आणि राष्ट्रवादी शरद पवार गट एकत्र येण्याची चर्चा सुरू झाली आहे, यावर प्रतिक्रिया देताना भाजप नेते चंद्रकांत पाटील यांनी खोचक टोला लगावला आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार आणि राष्ट्रवादी शरद पवार गटाचे अध्यक्ष शरद पवार हे पुन्हा एकदा एकत्र येणार असल्याची चर्चा सुरू आहे, या प्रश्नावर प्रतिक्रिया देताना त्यांनी खोचक टोला लगावला आहे. 'अशा प्रकारच्या चर्चा पवार कुटुंबाबाबत नेहमीच होतात. पण पुढे जाऊन त्या प्रत्यक्षात येत नाहीत. आताही सारखी चर्चा चालली आहे.**



अजितदादा, शरद पवार आणि सुप्रिया सुळे एवढाच त्यांचा पक्ष आहे. जयंत पाटील वगैरे हे सर्व जण असे लांब उभे असतात. काय तुम्ही निर्णय घेणार ते सांगा. हे तीन जण मिळून पक्ष होता. रोहित पवार वगैरे हे देखील सर्वजण लांबच आहेत. या तीन जणांच्या एकत्रीकरणाची अशी चर्चा खूप वेळा होते, पण गेल्या अडीच ते तीन वर्षांमध्ये ती काय अजून प्रत्यक्षात आलेली नाहीये,' असं चंद्रकांत पाटील यांनी म्हटलं आहे. दरम्यान ठाकरे बंधू एकत्र येतायेत म्हणून दोन्ही पवारांच्या एकत्रीकरणाची चर्चा सुरू झाली आहे का? असा प्रश्नही यावेळी चंद्रकांत पाटील यांना विचारण्यात आला, यावर उत्तर देणं त्यांनी टाळलं, माहीत नाही असं त्यांनी म्हटलं आहे.

दरम्यान दुसरीकडे शरद पवार आणि अजित पवार हे एकत्र येणार असल्याची चर्चा सुरू झाल्यानंतर महाविकास आघाडीच्या गोटात देखील हालचालींना वेग आला आहे. काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी शरद पवार यांची भेट घेतली होती, त्यानंतर आता शिवसेना ठाकरे गटाचे आमदार सचिन आहिर यांनी देखील पवार यांची भेट घेतली आहे. दोन्ही पवार एकत्रीत येणार असल्याच्या चर्चेच्या पार्श्वभूमीवर या भेटींना विशेष महत्त्व प्राप्त झालं आहे.

### दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येणार? कार्यकर्ते संभ्रमावस्थेत

बारामती: 'ग्रामपंचायत ते लोकसभा, प्रत्येक निवडणूक आम्ही लढवणार,' असे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या नेत्यांकडून यापूर्वी वेळोवेळी जाहीर करण्यात आले आहे. परंतु गत महिन्यापासून दोन्ही पवारांमध्ये जवळीक वाढली असून ते एकत्र येण्याच्याही चर्चा सुरू झाल्या आहेत. त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लढवू इच्छिणाऱ्या कार्यकर्त्यांमध्ये सध्या संभ्रमावस्था असल्याचे चित्र बारामतीत आहे. राष्ट्रवादीतील फुटीला आता दोन वर्षे होत आली आहेत. पक्ष फुटीनंतर सुरुवातीला लोकसभा आणि नंतर विधानसभा निवडणूक पार पडली. बारामतीकरांनी या दोन्ही निवडणुकांत वेगवेगळा कौल दिला. यानिमित्ताने उपमुख्यमंत्री अजित पवार यांची राष्ट्रवादी व राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष आमनेसामने आले. कार्यकर्त्यांची उमेद वाढविण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे, युगेंद्र पवार यांनी आम्ही प्रत्येक निवडणुका लढवू असे वेळोवेळी सांगितले होते, परंतु त्यानंतर छत्रपती कारखान्याच्या निवडणुकीत हा पक्ष अलिप्त राहिला.

सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानंतर आगामी 4 महिन्यांत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घ्याव्या लागणार आहेत. निवडणूक आयोगाने मुदतवाढीकरता न्यायालयात धाव घेण्याचा निर्णय घेतला आहे. आता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लांबणीवर पडण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. दुसरीकडे दोन्ही पवारांमधील जवळीक गेल्या काही दिवसांपासून वाढू लागली आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे चिरंजीव जय पवार यांच्या साखरपुड्यापासून ती अधिकाधिक वाढत चालली आहे. ज्येष्ठ नेते शरद पवार यांनीही एकत्रित येण्याचा निर्णय खासदार सुप्रिया सुळे यांच्या कोर्टात टोलावला आहे. साताऱ्यातील कार्यक्रमात उपमुख्यमंत्री अजित पवार व खासदार सुळे यांच्यात झालेला हास्यविनोद, सोमवारी (दि. 12) यशवंतराव चव्हाण सेंटरमध्ये ज्येष्ठ नेते शरद पवार व उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यात झालेली चर्चा यामुळे दोन्ही पक्ष एकत्रित येण्याची शक्यता अधिकच बळावली आहे. या परिस्थितीत दोन्हीकडील इच्छुक कार्यकर्ते सध्या



### बारामतीत कार्यकर्त्यांची बेचैनी वाढली

गेली दोन वर्षे आपापल्या पक्षासाठी बारामतीत कार्यकर्त्यांनी जीवाचे रान केले. प्रसंगी वाईटपणाही घेतला आहे. आता दोन्ही पवार एकत्र आले तर कार्यकर्त्यांच्या ते कितपत पचनी पडेल हाही प्रश्न आहे. बारामतीत या दोन्ही राष्ट्रवादींची चांगली ताकद होती. भाजपची ताकद अलीकडील काळात वाढली आहे. अन्य पक्षांची तेवढी ताकद नाही. परिणामी दोन्ही राष्ट्रवादीतच निवडणुकांत घमासान होणे शक्य आहे, परंतु आता मनोमिलनाचे संकेत येऊ लागल्याने कार्यकर्त्यांची बेचैनी वाढली आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार

# पावसाळी कोंडी सोडविण्यासाठी ‘मॉक ड्रिल’!

## पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांच्या हस्ते प्रमाणपत्र प्रदान

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**‘पावसाळ्यात होणारी कोंडी सोडविण्यासाठी वाहतूक पोलिसांनी आतापासून तयारी सुरू करणे गरजेचे आहे. आठवडाभरात महापालिका, अग्निशामक दल, तसेच विविध यंत्रणांशी समन्वय साधून मॉक ड्रिल करावे. पावसाळ्यात कोंडी झाल्यास आदेशाची वाट न पाहता वाहतूक शाखेतील सर्व पोलिसांनी रस्त्यावर उतरावे,’ असे स्पष्ट आदेश पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी बुधवारी दिले.**



वाहतूक शाखेतील पोलिसांसाठी अभ्यासक्रम सुरू करण्यात आला आहे. पहिल्या टप्प्यात अभ्यासक्रम पूर्ण करणाऱ्या वाहतूक शाखेतील पोलीस कर्मचाऱ्यांना पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांच्या हस्ते प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. या वेळी पोलीस आयुक्त अमितेश कुमार बोलत होते. या वेळी सहपोलीस आयुक्त रंजनकुमार शर्मा, अतिरिक्त पोलीस आयुक्त मनोजकुमार पाटील, वाहतूक शाखेचे उपायुक्त अमोल झेंडे, तसेच निवृत्त पोलीस अधिकारी सुरेंद्रनाथ देशमुख, अभ्यासक्रम मार्गदर्शक मंजिरी गोखले या वेळी उपस्थित होते.पोलीस आयुक्त अमितेश कुमार म्हणाले, ‘पावसाळ्यात कोंडी होती. रस्त्यात झाडाच्या फांद्या पडतात. त्या हटवून वाहतूक सुरळीत करण्याची गरज असते. त्यासाठी अग्निशामक दल, तसेच महापालिकेच्या उद्यान विभागासह विविध यंत्रणांशी समन्वय साधणे गरजेचे आहे. गेल्या पावसाळ्यात काही भागांत कोंडी झाली होती. कोंडी होण्यामागची कारणे शोधणे गरजेचे आहे. ज्या भागात पाणी साचते, तेथील पाण्याचा उपसा करण्यासाठी त्वरित मोटारपंपाचा वापर करणे गरजेचे असते. पावसाळी कोंडी सोडविण्यासाठी आतापासून वाहतूक पोलिसांनी तयारी करणे गरजेचे आहे. महापालिकेसह विविध यंत्रणांशी समन्वय साधून आठवडाभरात मॉक ड्रिल करावे.’‘शहराच्या वेगवेगळ्या भागांतील वाहतूक शाखेच्या अधिकाऱ्यांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या आदेशाची वाट न पाहता त्वरित उपाययोजना कराव्यात. पुढील तीन महिने वाहतूक पोलिसांच्या दृष्टीने महत्त्वाचे आहेत,’ असे त्यांनी नमूद केले.‘वाहतूक पोलिसांनी पूर्ण केलेल्या अभ्यासक्रमाचा फायदा होणार आहे. मानसिक आणि शारीरिकदृष्ट्या वाहतूक पोलिसांनी सक्षम असणे गरजेचे आहे.रस्त्यावरची कोंडी सोडविताना पोलिसांचे वर्तन महत्त्वाचे असतो. एखादी व्यक्ती वाद घालत असेल, तर त्याला समजावून सांगा. हातातील काम सोडून त्याच्याशी वाद घालण्यात अर्थ नाही. कायदेशीर कारवाई करा. मात्र, एखाद्याने अरेरावी केल्यास त्याला कायद्याच्या चौकटीत धडाही शिकवा. वाहतूककोंडी सोडविणे, सुरळीत ठेवण्यासाठी पोलिसांनी प्रयत्न करणे गरजेचे आहे,’ असे आयुक्त म्हणाले.

### ‘वाहतूक पोलिसांचे वर्तन महत्त्वाचे’

निधी यासाठी पाठपुरावा करण्यात येणार आहे. मुंबई पोलिसांच्या वाहतूक शाखेत येण्यापूर्वी पोलिसांना प्रशिक्षण देण्यात येते. पुणे पोलिसांच्या वाहतूक शाखेत येण्यापूर्वी वाहतूकविषयक प्रशिक्षण अभ्यासक्रम पूर्ण करणे गरजेचे आहे. प्रशिक्षण संस्था स्थापन करण्यापूर्वी पुणे पोलिसांना वाहतूक पोलिसांना प्रशिक्षित करण्यास सुरुवात केली आहे,’ पावसाळ्यात होणारी कोंडी सोडविण्यासाठी वाहतूक पोलिसांनी आतापासून तयारी सुरू करणे गरजेचे आहे. आठवडाभरात महापालिका, अग्निशामक दल, तसेच विविध यंत्रणांशी समन्वय साधून मॉक ड्रिल करावे. पावसाळ्यात कोंडी झाल्यास आदेशाची वाट न पाहता वाहतूक शाखेतील सर्व पोलिसांनी रस्त्यावर उतरावे.

# डॉक्टर - वैद्यकीय अधीक्षकांना धमकीचे मेसेज

## सुरक्षारक्षकानेच बॉम्ब ठेवल्याचा धमकी देणारा केला मेसेज

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पुण्यातील ससून रुग्णालयात बॉम्ब ठेवण्यात आला असून हा मेसेज करणाऱ्या आरोपीला अटक करण्यात बंडगार्डन पोलिसांना यश आले आहे.पण हा आरोपी ससून रुग्णालयातील सुरक्षारक्षक निघाला आहे. अरविंद कृष्णा कोकणी (वय 29, रा. नागपूर चाळ, येरवडा) असे आरोपी सुरक्षारक्षकाचे नाव आहे.**




पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ससून रुग्णालयातील डॉक्टरच्या मोबाईलवर 12 मे रोजी एका व्यक्तिकडून रुग्णालयात बॉम्ब ठेवला असल्याचा मेसेज आला. त्या मेसेजबाबत आम्हाला रुग्णालयामधून माहिती देण्यात आली. त्यानंतर बीडीडीएस पथकामार्फत तात्काळ रुग्णालय परिसराची तपासणी करण्यात आली.त्यामध्ये काहीही आढळून आले नाही.तो मेसेज कोठून आला आहे.याबाबत तपास सुरू होता.तो मेसेज रुग्णालय परिसरामधूनच आल्याचे स्पष्ट झाले.पण तो मोबाईल मेसेज केल्यानंतर बंद असल्याचे समोर आले.पण आमचा तपास सुरूच होता.त्यानंतर 14 मे रोजी आरोपी सुरक्षारक्षक अरविंद कृष्णा कोकणी याला पकडण्यात यश आले.तसेच त्याच्याकडे अधिक चौकशी केल्यावर, तो मोबाईल वॉर्ड क्रमांक 73 मधील एका महिला रुग्णाचा मोबाईल चोरून डॉक्टर आणि वैद्यकीय अधीक्षकांना धमकीचे मेसेज पाठवल्याची कबुली आरोपींनी दिली आहे.तसेच या आरोपीकडे अधिक चौकशी सुरू असल्याचे त्यांनी सांगितले.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ससून रुग्णालयातील डॉक्टरच्या मोबाईलवर 12 मे रोजी एका व्यक्तिकडून रुग्णालयात बॉम्ब ठेवला असल्याचा मेसेज आला. त्या मेसेजबाबत आम्हाला रुग्णालयामधून माहिती देण्यात आली. त्यानंतर बीडीडीएस पथकामार्फत तात्काळ रुग्णालय परिसराची तपासणी करण्यात आली.त्यामध्ये काहीही आढळून आले नाही.तो मेसेज कोठून आला आहे.याबाबत तपास सुरू होता.तो मेसेज रुग्णालय परिसरामधूनच आल्याचे स्पष्ट झाले.पण तो मोबाईल मेसेज केल्यानंतर बंद असल्याचे समोर आले.पण आमचा तपास सुरूच होता.त्यानंतर 14 मे रोजी आरोपी सुरक्षारक्षक अरविंद कृष्णा कोकणी याला पकडण्यात यश आले.तसेच त्याच्याकडे अधिक चौकशी केल्यावर, तो मोबाईल वॉर्ड क्रमांक 73 मधील एका महिला रुग्णाचा मोबाईल चोरून डॉक्टर आणि वैद्यकीय अधीक्षकांना धमकीचे मेसेज पाठवल्याची कबुली आरोपींनी दिली आहे.तसेच या आरोपीकडे अधिक चौकशी सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. पुण्यातील ससून रुग्णालयात बॉम्ब ठेवण्यात आला असून हा मेसेज करणाऱ्या आरोपीला अटक करण्यात बंडगार्डन पोलिसांना यश आले आहे.पण हा आरोपी ससून रुग्णालयातील सुरक्षारक्षक निघाला आहे.

### रुग्णालय परिसराची तपासणी

आरोपी सुरक्षारक्षकाचे नाव आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ससून रुग्णालयातील डॉक्टरच्या मोबाईलवर 12 मे रोजी एका व्यक्तिकडून रुग्णालयात बॉम्ब ठेवला असल्याचा मेसेज आला.त्या मेसेजबाबत आम्हाला रुग्णालयामधून माहिती देण्यात आली. त्यानंतर बीडीडीएस पथकामार्फत तात्काळ रुग्णालय परिसराची तपासणी करण्यात आली.

## अखेर महापालिकेचा एकत्रित प्रारुप विकास आराखडा मंजूर

# हरकती व सूचनांसाठी 60 दिवसांची मुदत!

## नियोजन समितीची स्थापना; 28 गावांची विकास योजना

। पिंपरी-चिंचवड ।महाईन्यूज ।प्रतिनिधी।

**पिंपरी - चिंचवड महापालिका व पिंपरी -चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाकडून वर्ग करण्यात आलेल्या क्षेत्राच्या एकत्रित प्रारुप विकास आराखड्यास अखेर मान्यता मिळाली आहे. पिंपरी -चिंचवड महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी बुधवारी (दि. १४) झालेल्या सर्वसाधारण सभेमध्ये महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियमाअन्वये आराखडा प्रसिद्ध करण्यास व नागरिकांकडून ६० दिवसाच्या आत हरकती व सूचना मागवण्यास मान्यता दिली आहे. पिंपरी - चिंचवड शहराची विकास योजनेस यापुर्वी सन २००८ मध्ये भागश: व सन २००९ मध्ये शासनाने अंतिम मान्यता दिली आहे.**

कायद्यामधील तरतुदीनुसार २० वर्षानंतर विकास योजना सुधारित करणेची तरतुद आहे. त्यानुसार, सन २०१९ मध्ये पिंपरी - चिंचवड महापालिका व पिंपरी - चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाने विकास योजना तयार करण्याचा निर्णय जाहिर केला होता. तसेच, विकास योजनेचे काम भौगोलिक माहिती प्रणालीद्वारे (जी.आय.एस.) पुर्ण करण्यासाठी अहमदाबाद येथील संस्था एच.सी.पी. यांची नेमणुक केली होती. संबंधित संस्थेने उपग्रह प्रतिमा, ड्रोन, व टोटल स्टेशनच्या माध्यमातून जमिनीचे सर्व्हेक्षण करुन विद्यमान जमिन वापर नकाशा महापालिकेकडे मार्च २०२२ मध्ये हस्तांतरीत केला होता. तसेच, सन २०२१ हे पायाभुत वर्ष गृहित धरुन भविष्यात सन २०३१ साठी ४२.४ लाख व सन २०४१ साठी ६१ लाख इतकी लोकसंख्या अपेक्षित धरली आहे. त्यास नगररचना संचालकांची मान्यता घेतली आहे.



### 12 ते 18 मीटर रस्त्यांचे रुंदीकरण प्रस्तावित

प्रसिद्ध करण्यात येणारी विकास योजना २८ गावांसाठी असून क्षेत्रफळ १७३.२४ चौरस किलोमीटर इतके आहे. तसेच, केंद्र शासनाचे शहर नियोजनाच्या दृष्टीने वापरावयाचे शहर नियोजन प्रमाणक, यापुर्वीचे मंजुर विकास योजनांसाठी वापरलेल्या शहर नियोजन प्रमाणकांचा सखोल अभ्यास करुन तसेच प्रचलित एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीमधील वाढलेल्या चटई क्षेत्र निर्देशांकाचा विचार करुन शहर नियोजन प्रमाणकाप्रमाणे आरक्षणासाठी आवश्यक ते क्षेत्र कमी करण्यात आले आहे. भविष्यातील लोकसंख्येत होणारी वाढ विचारात घेऊन कमीत कमी क्षेत्रावर आरक्षणे प्रस्तावित करण्यात आलेली आहेत. प्रारुप विकास योजनेमध्ये पिंपरी चिंचवड शहराच्या लगत पुणे महापालिका, पीएमआरडीएमधील रस्त्यांचे समन्वय राखण्यात आलेले आहेत. तसेच, दाटवस्ती क्षेत्रामध्ये रस्त्याची कमीत कमी रुंदी १२ मीटर ठेवण्यात आली आहे. नव्याने प्रस्तावित रस्तारुंदी कमीत कमी १८ मीटर आहे. तसेच, आवश्यक तेथे विद्यमान रस्त्यांना रुंदीकरण प्रस्तावित करण्यात आलेले आहे.

### प्रस्तावित आरक्षणे...

१) आवश्यक तेथे चार्जिंग स्टेशन
२) मेट्रो स्टेशन परिसरात वाहनतळ
३) ट्रॅव्हल बससाठी स्टँड, ट्रक टर्मिनस
४) स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स, कमर्शिअल कॉम्प्लेक्स व कन्व्हेंशनल सेंटर
५) कमी उत्पन्न गटातील घरांसाठी व म्हाडासाठी आरक्षणे
६) भाजीमंडई, अग्निशमन केंद्र, स्मशानभुमी, दफनभुमी
७) प्राथमिक व माध्यमिक शाळा
८) बगीचा, खेळाचे मैदान, रुग्णालय, कत्तलखाना,
९) जनावरांसाठी दहन व्यवस्था, पशुवैद्यकीय रुग्णालय
१०) मैलाशुद्धीकरण, जलशुद्धीकरण प्रकल्प, पाण्याची टाकी,
११) दोन ठिकाणी पालखी तळासाठीही आरक्षण
१२) हरित पट्टाऐवजी रिव्हर फ्रंट रिक्रिएशनल साईट असे आरक्षण

### नियोजन समितीची स्थापना

विकास योजना प्रसिद्धीनंतर नियोजन समितीची स्थापना करणेत येईल. स्थायी समितीचे ३ सदस्य व ४ वेगवेगळ्या विषयामधील तज्ञ अशा एकूण ७ सदस्यांची समिती असेल. हरकती, सुचना आल्यानंतर नियोजन समितीसमोर सुनावणीस संधी देण्यात येईल. सुचनांनुसार, समिती आवश्यक ते बदल करण्याची शिफारस नियोजन प्राधिकरणाकडे करेल. समितीच्या स्थापनेनंतर २ महिन्यात समितीने अहवाल नियोजन प्राधिकरणाकडे सादर करावयाचा आहे. त्यानंतर कलम ३० अन्वये विकास योजना अंतिम मंजुरीसाठी शासनास सादर करणेत येईल.

---

## राष्ट्रीय महामार्गालगतच्या सेवा रस्त्यांच्या कामाला गती

## महापालिका रस्ते विकसित करणार; कामाला गती देण्यासाठी आयुक्त शेखर सिंह यांची बैठक

। पिंपरी-चिंचवड ।महाईन्यूज ।प्रतिनिधी।

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतून मुंबई-बंगलोर राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४८ जातो. शहरातील दळणवळण व्यवस्था सुरळित होण्याच्या दृष्टीकोनातून या महामार्गालगत असणारे सेवा रस्ते महत्त्वाचे ठरतात. त्यामुळे या सेवा रस्त्यांचा विकास करताना सर्व प्रशासकीय यंत्रणांनी समन्वयाने नियोजन करून गतीने कामकाज पूर्ण करावे, असे निर्देश आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी दिले.**

महापालिका हद्दीतून जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४८ लगत असणाऱ्या सेवा रस्त्यांच्या विकासाबाबत महानगरपालिका आणि भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण अर्थात एनएचएआयच्या अधिकाऱ्यांची संयुक्त आढावा बैठक आयुक्त शेखर सिंह यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाली.

या बैठकीस भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे प्रकल्प संचालक संजय कदम यांच्यासह महापालिका अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, शहर अभियंता मकरंद निकम, मुख्य अभियंता संजय कुलकर्णी, उपायुक्त मनोज लोणकर, विशेष अधिकारी किरण गायकवाड, क्षेत्रिय अधिकारी अमित पंडित आदी उपस्थित होते.



### सेवा रस्त्यांच्या कामाचा विस्तार


शहरातून जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४८ च्या बाजुने असणारा सध्याचा रस्ता १२ मीटर रुंद आहे. आता या रस्त्याचा आणखी १२ मीटर विस्तार करून एकूण रुंदी २४ मीटर करण्यात येणार आहे. त्यादृष्टीने प्रकल्पाचा अंतिम आराखडा भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने यांनी तयार केला आहे. त्यांच्या मार्फत या रस्त्याचे विकसन केले जाणार आहे. या रस्त्याशी संबंधित विविध विषयांवर आढावा बैठकीत चर्चा करण्यात आली.

### समन्वय साधण्याच्या सूचना

हा रस्ता विकसित करताना अडथळा ठरणारे सर्व होर्डिंग्ज, अनधिकृत टपऱ्या, बांधकाम त्वरीत हटवण्याचे आदेश आयुक्त सिंह यांनी दिले आहेत. रस्त्याच्या कामाला अडथळा ठरणाऱ्या भूमीगत सेवा वाहिन्या टाकताना भविष्याचा विचार करून नियोजन करावे. मलवाहिन्या, जलवाहिन्या, विद्युतवाहिन्या, जल:निसारण वाहिन्या आदी सर्व सेवांचा सर्वंकष विचार करून रस्त्याचे विकसन करावे. सेवा रस्त्यावर असलेल्या व्यवस्थांचा देखील यामध्ये विचार करावा, असेही आयुक्त सिंह यावेळी म्हणाले. सेवा रस्त्यांचे विकसन होत असताना विद्युत, जल:निसारण, पाणी पुरवठा, अतिक्रमण, आकाशचिन्ह व परवाना, क्षेत्रिय कार्यालये आदी विविध विभागांशी संबंधित कामकाज समन्वयाने पार पाडावे. विहित मुदतीत काम पूर्ण व्हावे, यासाठी महापालिकेच्या संबंधित विभागांनी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाला आवश्यक ते सहकार्य करावे, अशा सूचनाही आयुक्त सिंह यांनी यावेळी दिल्या.

> "वाहतूक व्यवस्थापन सुधारण्यासाठी होईल मदत राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४८ च्या लगत असणाऱ्या सेवा रस्त्यांचा विस्तार झाल्यानंतर या रस्त्यावर होणारी वाहतूक कोंडी कमी होण्यास मदत होणार आहे. या सेवा रस्त्यांमुळे मुख्य महामार्गावरील गर्दी कमी होईल. तसेच वाहतूक व्यवस्थापन सुधारण्यास मदत होणार आहे.
> **- प्रदीप जांभळे पाटील,**
> अतिरिक्त आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका

## श्रीब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजांची प्रवचने



### विषयाची व लौकिकाची आस सोडावी

आपण रामाचे झालो म्हणजे आपली काळजी त्याला लागते. आपण रामाचे व्हायला अडचण आमचीच. आवडच मुळी आपण विषयाची आणि लौकिकाची ठेवतो. साहजिकच, एकाची आसक्ती ठेवल्याने दुसऱ्याची विरक्ती येते. नोकरीच्या वेळेस आम्ही बायकोमुलांना बाजूला सारून कामावर जातो ना? मग साधनेच्या वेळी बायकोमुले आड येतात हे कारण का सांगावे ? बायको आणि पैका या दोन गोष्टी आमच्या आड येत असतात; असे आजवर अनेक संतांनी सांगितले. मग या निर्माण तरी का केल्या असे कोणी विचारतील. त्याला उत्तर म्हणजे, काड्याच्या पेटीने विस्तवही पेटविता येतो आणि घरही जाळता येते; त्याचा जसा आपण उपयोग करावा तसा तो होतो. खरे म्हणजे आम्हाला भगवंताची तळमळच लागत नाही. एकजण मला म्हणाला की, " मला प्रपंच टाकावासा वाटतो. " मी त्याला म्हटले, " नुसता प्रपंच टाकण्याने तुला वैराग्य कसे येईल ? वैराग्याला नेहमी विवेकाची जोड लागते. तू आपला मीपणा टाकलास तरी खूप झाले. " चांगले कर्म आड येत नाही असे थोडेच आहे ? वाईट कर्म कुणाला सांगण्याची तरी आपल्याला लाज वाटते, पण सत्कर्म आपण अभिमानाने ज्याला त्याला सांगत सुटतो. ' मागील जन्मी पाप केले होते म्हणून या जन्मी हे भोगतो ' असे म्हणतो; आणि 'आता चांगली कर्मे करतो म्हणजे पुढल्या जन्मी सुख लागेल ' असे म्हणतो. म्हणजे जन्ममरणाच्या फेऱ्यांतून सुटण्याऐवजी त्याच्यात गुंडाळले जाण्यासारखेच झाले ! दुष्कर्मामुळे पश्चात्ताप होऊन एकदा तरी भगवंताची आठवण होईल; परंतु सत्कर्माचा अहंकार चांगल्या माणसालाही कुठे नेऊन सोडील याचा पत्ता लागणार नाही. राजासुद्धा योग्य मार्ग दाखविण्यासाठी आपल्या संगतीला चांगला माणूस ठेवतो. भगवंताने उद्धवालाही ' सत्समागम कर ' म्हणून सांगावे, याहून अधिक काय पाहिजे ? कडू कारले खाल्ले तर कडूपणाचीच प्रचीती येते, मग विषयाच्या प्राप्तीने जीवन गोड कसे होईल ? ' प्रेम येईल तेव्हा भगवंताची भक्ती करीन ' असे म्हणू नये. विषयासाठी आपण मरमर काम करतो आणि तेवढे करूनही सुख लाभत नाही; मग भगवंताचे नाव न घेता, प्रेम येत नाही हे म्हणणे किती वेडेपणाचे आहे ! लग्नाआधी मुलीला दहापाचजणांना दाखविली तरी, लग्न झाल्यावर ज्याप्रमाणे त्यातला एकच नवरा असतो आणि बाकीच्यांची तिला आठवणही राहत नाही, त्याप्रमाणे, आम्ही एकदा रामाचे झालो, म्हणजे त्याच्याशी लग्न लावले, म्हणजे मग विषयांचे प्रेम कुठे आले?

**बोधवचन:- भगवंताच्या नामाची गरज दोन तऱ्हेने आहे : एक प्रपंचाचे स्वरूप कळण्यासाठी, आणि दुसरी, भगवंताच्या प्राप्तीसाठी.**



'स्टेट'मेंट
अधिकराव दिवे-पाटील
संस्थापक, संपादक

# दहशतवादाचा क्रूर 'हिरवा' चेहरा, उखडून टाकणार 'भगवा' मोहरा !



**'ऑपरेशन सिंदूर' च्या निमित्ताने संपूर्ण जगाने पाकिस्तानच्या पाठिंब्यावर सुरू असलेल्या दहशतवादाचा क्रूर हिरवा चेहरा पाहिला..भारताची तिन्ही सुरक्षा दले म्हणजे लष्कर, हवाई दल आणि नौदल यांनी एकी दाखवली आणि नियोजनबद्ध रीतीने या दहशतवादाचा बीमोड केला.. ते देशभक्तीचे भगवे मोहरेही अवघ्या जगाने पाहिले.. युद्धाच्या रणांगणात कधीही, कुठेही आणि केव्हाही भारत पाकिस्तानला नामोहरम करू शकतो, याचा एक मोठा धडा भारताने घालून दिला आहे.**

### उद्ध्वस्त पाकिस्तान, एयरबेस..

भारताने केलेल्या हवाई हल्ल्यांमध्ये पाकिस्तानी वायुसेनेच्या २० टक्के 'ऑपरेशनल इन्फ्रास्ट्रक्चर' ची भयंकर वाताहत झालेली आहे, पाकिस्तानचे अनेक एयरबेस उद्ध्वस्त झाले आहेत. एवढेच नव्हे तर पाकड्यांच्या एअर डिफेन्स यंत्रणांची जवळपास ७५ टक्के पूर्णपणे नासाडी झालेली आहे. त्यांच्या हवाई दलाची ३० ते ९० लढाऊ विमाने त्यांच्या बंदिस्त तळांवर नष्ट झालेली आहेत. पाकिस्तानी अण्वस्त्रे जिथे साठवली जातात आणि अण्वस्त्र हल्ल्यांसाठी जिथे ठेवली जातात अशा तीन एअरबेसवर त्यांचे अतोनात नुकसान झालेले आहे. भारताच्या तिन्ही दलांच्या पत्रकार परिषदेमध्ये दिलेल्या आकडेवारीसह मुद्दाम हे नमूद केले आहे.

### अण्वस्त्रे नष्ट झाल्याचा पुरावा नाही..

भारतीयांनी चढवलेल्या या हल्ल्यांच्या दरम्यान पाक अण्वस्त्रे नष्ट झाली, याचा कोणताही खात्रीशीर पुरावा सध्यातरी कोणीच दिलेला नाही आणि या संदर्भात ज्या बातम्या येत आहेत, त्या विश्वासार्ह नक्कीच नाहीत. या संदर्भात पहिले पिल्लू अमेरिकेचे अध्यक्ष ट्रम्प यांनी सोडले. " युद्ध चालू राहिल्यास लाखो लोक मारले जातील, म्हणून युद्धबंदी केली पाहिजे." असा दावा त्यांनी करून अणूयुद्ध टाळल्याचा शड्डू ठोकला आहे. त्याच्या या ट्विटर लोकांनी नूर खान एअर बेसवर असलेल्या किराना हिल्स न्युक्लिअर स्टॉक पाईल्स गेटवर भारताने हवाई हल्ला केला, अशा बातम्या प्रसिद्ध झाल्या खऱ्या, पण पुन्हा त्यात अण्वस्त्रांचा उल्लेख नाही.

### किरणोत्सर्ग, भूकंपाच्या बातम्या

त्यानंतर, मग पाकमध्ये किरणोत्सर्ग पसरला आहे, अशी खोटी पत्रे प्रसारित झाली, त्यानंतर इजिप्त मधून बोरॉन घेतलेले विमान पाकिस्तानात उतरले ही बातमी आली. आता लिकेजमुळे पाकिस्तानी लोकांना उलट्या सुरू झाल्या, अशा बातम्या पेरल्या जात आहेत. त्याजोडीला पाकिस्तानात हलके भूकंप झाल्याच्या बातम्या नित्य येत आहेत. प्रत्यक्षात काय झाले आणि तिथे परिस्थिती काय आहे, याचा नेमका अंदाज कुणालाही नाही.

भारताचे 'ऑपरेशन्स कमांडर' काय म्हणतात?

दोन दिवसांपूर्वी, पत्रकार परिषदेत वरिष्ठ वायू सेना अधिकाऱ्याला अण्वस्त्रसाठ्यांवर केलेल्या हल्ल्याबाबत विचारल्यावर त्यांनी जे उत्तर दिले, ते सध्या तरी प्रत्येक भारतीयाने 'अंतिम सत्य' मानले पाहिजे. ते म्हणाले 'तिथे अण्वस्त्रे होती, हे मला आत्ता कळले, आम्ही त्यावर हल्ला केलेला नाही !'

### खोटं पसरवण्यात तरबेज..

पाकिस्तानी गुप्तचर संस्था 'साय वॉर' अर्थात मनोवैज्ञानिक युद्धात तरबेज आहेत. त्यांची जनता त्यांच्या संस्थांच्या कौशल्यामुळे अजूनही हेच मानते, की पाकिस्तानने १९६५ आणि १९७१ ची युद्धे जिंकलेली आहेत. त्यांच्या सोयीच्या बातम्या भारतीय मीडियात पेरण्यासाठी ते उथळ, भोळ्या,अति उत्साही, बिनडोक, मूर्ख भारतीय सोशल मीडिया युजर्सचा खुबीने वापर करून घेतात, हे देखील आता सर्व भारतीयांना माहीत झाले आहे.

### भारतीयांची मूर्खपणाची मानसिकता..

भारताने पाकिस्तानच्या अण्वस्त्र साठ्यांवर हल्ला करून समस्त प्रजेला आण्विक प्रदूषणात लोटले, भारत युद्धखोर आहे, भारत, चीन आणि अन्य प्रतिस्पर्धी देशांसाठी भविष्यात डोकेदुखी ठरेल, भारतीय प्रजा युद्धखोरीला उत्तेजन देते इत्यादी अनेक पाकिस्तानी सिद्धांत आपण स्वतःच्या हाताने आणि कृतीने जगाला सिद्ध करून दाखवत आहोत.

विदेशी गुप्तचरांचे जाळे, हसणारे भारतीय..

एक लक्षात घ्यायला हवे, आपण विदेशी गुप्तचर यंत्रणेच्या अत्यंत स्मार्ट सापळ्यात अडकलेले आहोत आणि यातून बाहेर येण्यासाठी मोठ्या प्रयत्नाची गरज आहे. त्यासाठी योग्य माहिती बाळगणे आणि सूज्ञपणाने वागण्याची आवश्यकता आहे. भारताने खरेच हल्ला केलेल्या जागा उघड उघड सांगितल्या आहेत. भारतीय पंतप्रधानांनी तर 'आम्हाला आण्विक हल्ल्याच्या धमक्या देऊ नका,' हे अख्ख्या जगासमोर सांगितले आहे. भारतीय हल्ल्याचे बळी पडलेल्या एअरबेसवर काही आण्विक तळ होते आणि त्या बेस वर कित्येक पाक सैनिक बळी पडलेले आहेत. सध्या आपल्यासाठी इतकी माहिती पुरेशी आहे. यापेक्षा अन्य माहिती आपल्यासाठी सोयीची नाही, किंवा त्याचा गवगवा करण्याची गरज नाही !

### आपल्या बावळटपणाला उत्तर काय?

नुकतीच एक ब्रेकिंग बातमी पाहिली..अमूक गावच्या जवानाने पाडले पाकचे ११ ड्रोन ! परिसरातून झाला कौतुकाचा वर्षाव!.. या बातमीत तो जवान कुठे तैनात आहे, त्याचचे नाव काय, यासह त्याचा कानाला कम्युनिकेशन पॉड लावलेला फोटो सुद्धा आहे ! हा मूर्खपणा कुठपर्यंत जाईल कल्पना आहे? त्याच्या एअर डिफेन्स युनिटची लोकेशन एव्हाना जगाला कळलेली आहे, त्याचे नाव, पत्ता उघड आहे, फोटो छापलेला आहे ! उद्या हा जवान पाकिस्तानी 'हनी ट्रॅपिंग' चा बळी ठरल्यास याला जबाबदार कोण? उथळ मीडिया? की आम्हा भारतीयांचा बेजबाबदार मूर्खपणा ? की पायावर धोंडा पाडून घेण्याची वृत्ती?

### आत्मचिंतन आणि संयमाची गरज !

सद्य परिस्थितीचा संपूर्ण गोषवारा काढला तर जियोपॉलिटिक्स, डिफेन्स, इंटर्नल सिक्युरिटी, इंटेलिजन्स या विषयात आपल्याला मोठ्या साक्षरतेची गरज आहे.. अमूकला ठोकला, तमूकला उडवला..वगैरे गोष्टींच्या बाहेर बराच मोठा हिस्सा आहे, जो आपल्याला माहीत नाही. आलेली प्रत्येक गोष्ट सोशल मीडियावर टाकून तिला मसाला लावून साजरी करणे अनेक वेळा योग्य नाही आणि आवश्यक त्याहूनही नाही.. कुठेतरी मननाची, आत्मचिंतनाची आणि संयमाची गरज आहे!

### भारताचे उज्ज्वल भवितव्य..

आपली अर्थव्यवस्था येणाऱ्या दोन वर्षात जपान आणि जर्मनीला मागे टाकून जगातली तिसऱ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था झालेली असेल. सध्या आपल्याकडे दोन विमानवाहू युद्धनौका आहेत, भविष्यात आपले जागतिक आर्थिक हितसंबंध राखण्यासाठी आपल्याकडे ७ ते १० विमानवाहू युद्धनौका असतील आणि त्या साता-समुद्रात गस्त घालत असतील. तेव्हा आपली मिसाईल जगाच्या कोणत्याही कोपऱ्यात मारा करू शकतील. आपण लक्ष्य करू तो सॅटेलाईट पाडू असे तंत्रज्ञान आपल्याकडे असेल. त्यावेळी आपली जनता अत्यंत प्रबुद्ध आणि जियोपॉलिटिक्स, डिफेन्स, इंटर्नल सिक्युरिटी, इंटेलिजन्स या विषयात किमान आवश्यक ज्ञान बाळगणारी असली पाहिजे, असे वाटत नाही का ?

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# भारत झुकणार नाही : मुख्यमंत्री फडणवीस

## भारताने ‘ऑपरेशन सिंदूर’च्या माध्यमातून प्रत्युत्तर दिलं

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**जम्मू काश्मीरच्या पहलगाममधील दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने ‘ऑपरेशन सिंदूर’च्या माध्यमातून जोरदार प्रत्युत्तर दिलं. भारताने ‘ऑपरेशन सिंदूर’ राबवत पाकिस्तान आणि पाकव्याप्त काश्मीरमध्ये तब्बल ९ ठिकाणी असलेल्या दहशतवादी तळांना उद्ध्वस्त केलं. तसेच त्यानंतर पाकिस्तानकडून भारताच्या सीमेवर होणाऱ्या ड्रोन हल्ल्याला देखील भारताने चोख प्रत्युत्तर दिलं.**



दरम्यान, भारतीय सैन्यांनी ऑपरेशन सिंदूर राबवत पाकिस्तानला दिलेल्या जोरदार प्रत्युत्तराच्या पार्श्वभूमीवर सर्वत्र भारतीय सैन्यांचं कौतुक करण्यात येत आहे. या अनुषंगानेच आज मुंबईत भाजपाच्यावतीने तिरंगा रॅली काढण्यात आली होती. या तिरंगा रॅलीत राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी संबोधित करताना भारतीय जवानांचं कौतुक करत ऑपरेशन सिंदूरबाबत भाष्य केलं. भारत झुकणार नाही हे ऑपरेशन सिंदूरने दाखवलं असल्याचं त्यांनी म्हटलं आहे.‘सुन ले बेटा पाकिस्तान, बाप तेरा हिंदुस्तान अशी घोषणाबाजी करत देवेंद्र फडणवीस म्हणाले की, “आज तिरंगा रॅलीच्या माध्यमातून आपल्या देशातील सैन्यांचे आभार व्यक्त करण्यासाठी आपण या ठिकाणी एकत्र आलो आहोत. भारतीय सैन्यांची ताकद काय आहे हे ऑपरेशन सिंदूरच्या माध्यमातून दाखवून दिलं. हमें कोई झुका नहीं सकता, हम ना झुकेंगे ना रुकेंगे ना बिकेंगे ना थकेंगे, अशा प्रकारची भारतीय सेनेची ताकद ऑपरेशन सिंदूरच्या माध्यमातून सर्वांना कळली असेल”, असं देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं.“दहशतवाद्यांनी पहलगाममध्ये २७ जणांना ज्या पद्धतीने मारलं, धर्म विचारून मारलं, पत्नीसमोर पतीला मारलं, मुलासमोर वडिलांना मारलं. अशा प्रकारचं हत्याकांड भारताच्या नाही तर जगाच्या इतिहासात आपल्याला कधी पाहायाला मिळालं नव्हंत. त्यामुळे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देखील जशास तसं प्रत्युत्तर देणारं असं सागितलं होतं. त्यानंतर भारतीय सैन्यांनी ऑपरेशन सिंदूर राबवलं आणि जोरदार प्रत्युत्तर दिलं”, असं देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं. “आमच्या बहिणींचं कुंकू पुसण्याचं काम केलं त्यांना ऑपरेशन सिंदूरच्या माध्यमातून धडा शिकवला. भारतीय सैन्यांनी पाकिस्तानात घूसून दहशतवाद्यांचे अड्डे उद्ध्वस्त केले. भारताने ज्या ९ ठिकाणी दहशतवाद्यांचे अड्डे उद्ध्वस्त केले, त्या ठिकाणी भारतीय सेना कधीच पोहचणार नाही असं पाकिस्तानला वाटायचं. मात्र, तेथेच जाऊन भारतीय सैन्यांनी दहशतवाद्यांचा खात्मा केला. तसेच पाकिस्तानला हे दाखवून दिलं की दहशतवादी कुठेही लपले तरी आम्ही सोडणार नाही”, असंही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले.ऑपरेशन सिंदूरनंतर पाकिस्ताने भारतावर हल्ला करण्याचा प्रयत्न केला. मात्र, त्यांचा हल्ला करण्याचा प्रयत्न यशस्वी होऊ शकला नाही. भारताने पुन्हा दाखवून दिलं की आपली डिफेन्स सिस्टीम किती मजबूत आहे. भारतीय सैन्यांची ताकद जगाने पाहिली. पाकिस्तानला भारतापुढे गुढगे टेकावे लागले आणि मग शस्त्रसंधी झाली”, असंही देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. पाकिस्तानला दिलेल्या जोरदार प्रत्युत्तराच्या पार्श्वभूमीवर सर्वत्र भारतीय सैन्यांचं कौतुक करण्यात येत आहे. या अनुषंगानेच आज मुंबईत भाजपाच्यावतीने तिरंगा रॅली काढण्यात आली होती. या तिरंगा रॅलीत राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी संबोधित करताना भारतीय जवानांचं कौतुक करत ऑपरेशन सिंदूरबाबत भाष्य केलं.

### हम ना झुकेंगे ना रुकेंगे

भारत झुकणार नाही हे ऑपरेशन सिंदूरने दाखवलं असल्याचं त्यांनी म्हटलं आहे.‘सुन ले बेटा पाकिस्तान, बाप तेरा हिंदुस्तान अशी घोषणाबाजी करत देवेंद्र फडणवीस म्हणाले की, “आज तिरंगा रॅलीच्या माध्यमातून आपल्या देशातील सैन्यांचे आभार व्यक्त करण्यासाठी आपण या ठिकाणी एकत्र आलो आहोत. भारतीय सैन्यांची ताकद काय आहे हे ऑपरेशन सिंदूरच्या माध्यमातून दाखवून दिलं. हमें कोई झुका नहीं सकता, हम ना झुकेंगे ना रुकेंगे ना बिकेंगे ना थकेंगे, अशा प्रकारची भारतीय सेनेची ताकद ऑपरेशन सिंदूरच्या माध्यमातून सर्वांना कळली असेल”, असं देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं.

# दाऊदच्या सहकाऱ्याला न्यायालयाकडून जामीन

## दीर्घकाळ तुरुंगवास, खटला पूर्ण होण्याची शक्यता नसल्याने निर्णय

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**कुख्यात गुंड दाऊद इब्राहिम याचा जवळचा सहकारी तारिक परवीन याला उच्च न्यायालयाने २०२० सालच्या खंडणी प्रकरणात नुकताच जामीन मंजूर केला. परवीन गेल्या पाच वर्षांपेक्षा अधिक काळ तुरुंगात आहे आणि नजीकच्या काळात त्याच्यावर चालवण्यात येणारा खटला पूर्ण होण्याची शक्यता नाही. त्यामुळे, त्याला जामीन मंजूर करण्यात येत असल्याचे न्यायालयाने प्रामुख्याने स्पष्ट केले.**

एका कच्च्या कैद्याला एवढ्या प्रदीर्घ काळासाठी कारागृहात ठेवणे हे खटला जलदगतीने चालवण्याच्या त्याच्या मूलभूत अधिकाऱाचे उल्लंघन आहे. तसेच, खटल्याविना कारावास म्हणजे त्याला दोषी ठरवण्यापूर्वी दिलेली शिक्षाच आहे, अशी टिप्पणीही न्यायमूर्ती मिलिंद जाधव यांच्या एकलपीठाने परवीन याला दिलासा देताना केली.

भारतीय दंड संहिता (आयपीसी) आणि महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायद्याच्या (मोक्का) तरतुदींतर्गत परवीन याच्याविरुद्ध २०२० साली खंडणीचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. या प्रकरणी परवीनने जामिनाची मागणी केली होती. जामीन मिळाल्यनंतर परवीनची बुधवारी नवी मुंबईतील तळोजा कारागृहातून सुटका झाली. फेब्रुवारी २०२० मध्ये परवीन याला अटक झाली होती. त्यामुळे, गेल्या पाच वर्षांपासून तुरुंगात



असलेल्या परवीन याने दीर्घ तुरुंगवास आणि नजीकच्या भविष्यात खटला पूर्ण होण्याचीच शक्यता नसल्याच्या कारणास्तव जामिनाची मागणी केली होती. गुन्हा सिद्ध होईपर्यंत आरोपी निर्दोष असतो दोष सिद्ध होईपर्यंत आरोपी निर्दोष असतो हा फौजदारी न्यायशास्त्राच्या मूलभूत नियमांपैकी एक नियम आहे.

त्यामुळे, एखाद्या कच्च्या कैद्याचे स्वातंत्र्य पाच वर्षांहून अधिक काळ धोक्यात आले असेल तर अशा वेळी हा नियम हलक्यात घेता येणार नाही, असेही न्यायालयाने परवीनला जामीन मंजूर करताना नमूद केले.पुराव्यांचे पुरेसे मूल्यांकन केल्यानंतर परवीनचा गुन्ह्यातील सहभाग हा खटल्यादरम्यान सिद्ध होऊ शकतो.

तारिक परवीन याला उच्च न्यायालयाने २०२० सालच्या खंडणी प्रकरणात नुकताच जामीन मंजूर केला. परवीन गेल्या पाच वर्षांपेक्षा अधिक काळ तुरुंगात आहे आणि नजीकच्या काळात त्याच्यावर चालवण्यात येणारा खटला पूर्ण होण्याची शक्यता नाही. त्यामुळे, त्याला जामीन मंजूर करण्यात येत असल्याचे न्यायालयाने प्रामुख्याने स्पष्ट केले.

### ...तर त्याला शिक्षा नक्कीच होईल

तसेच, त्याला दोषी ठरवण्यात आल्यास त्याला शिक्षाही होईल. तथापि, परवीन याला आपण केवळ दीर्घ कारावास आणि प्रलंबित खटल्याच्या कारणास्तव जामीन देत असल्याचे न्यायमूर्ती जाधव यांच्या एकलपीठाने प्रामुख्याने स्पष्ट केले.त्यांनी या ट्वीटच्या माध्यमातून अत्यंत महत्त्वाची मागणी केली आहे.आदित्य ठाकरे यांनी पोस्टमध्ये म्हटलंय की, “मला आशा आहे की आज भारत सरकार जगाला हे स्पष्ट करेल की काश्मीर कोणत्याही चर्चेचा भाग नाही. काश्मीर हा भारताचा अविभाज्य भाग आहे आणि नेहमीच राहील. हा आंतरराष्ट्रीय मुद्दा नाही, अगदी द्विपक्षीय मुद्दाही नाही. पीओकेचा भाग हा द्विपक्षीय मुद्दा आहे. तो प्रदेश भारताचा आहे आणि तो भारताला परत करावा लागेल.”एका कच्च्या कैद्याला एवढ्या प्रदीर्घ काळासाठी कारागृहात ठेवणे हे खटला जलदगतीने चालवण्याच्या त्याच्या मूलभूत अधिकाऱाचे उल्लंघन आहे.

# बलुचिस्तान पाकिस्तानचा भाग नाही!

## भारतासह जगभरातील देशांकडे केली मोठी मागणी

। नवी दिल्ली । प्रतिनिधी : महाईन्यूज ।

बलोच नेते मीर यार बलोच यांनी बुधवारी (१४ मे) बलुचिस्तान पाकिस्तानपासून स्वतंत्र झाल्याची घोषणा केली आहे. अनेक दशकांपासून बलुचिस्तानात चालू असलेली हिंसा, मानवी तस्करी, बेपत्ता होणारी माणसं, मानवाधिकाराचं उल्लंघन पाहून आम्ही पाकिस्तानपासून स्वतंत्र होत असल्याची मीर यार बलोच यांनी घोषणा केली आहे. त्यांनी एक्स या मायक्रोब्लॉगिंग प्लॅटफॉर्मवर याबाबतची एक पोस्ट शेअर केली आहे. "जगाने आता शांत बसू नये, त्यांनी आम्हाला देश म्हणून मान्यता द्यावी", असंही मीर यार बलोच यांनी म्हटलं आहे. त्यांनी भारतासह आंतरराष्ट्रीय समुदायाकडे समर्थनाची मागणी केली आहे.

मीर यार बलोच यांनी पाकिस्तानी सरकार व लष्कराला उद्देशून म्हटलं आहे की "तुम्ही आम्हाला माराल, तर आम्ही पुन्हा उभे राहू, आम्ही आमचा वंश वाचवण्यासाठी धडपडतोय, आम्हाला साथ द्या". पाकिस्तानने बेकायदेशीरपणे ताबा मिळवलेल्या बलुचिस्तानमधील बलोच लोक रस्त्यावर उतरले आहेत. बलुचिस्तान हा आता पाकिस्तानचा भाग नाही असा निर्णय त्यांनी घेतला आहे. जगाने डोळ्यावर पट्टी बांधून याकडे केवळ बघत बसू नये, असंही मीर यार यांनी म्हटलं आहे.बलोच नेत्याने भारतीय प्रसारमाध्यमं, युट्यूबर्स व बुद्धीजीवी लोकांना विनंती केली आहे की "आम्ही बलुची लोक आहोत. आम्ही पाकिस्तानी नाही. आम्हाला पाकिस्तानी म्हणणं थांबवा. पंजाबी लोक (पाकिस्तानच्या पंजाब प्रांतातील लोक) हे केवळ पाकिस्तानी आहेत. कारण त्यांनी कधी त्यांच्यावर हल्ले झालेले पाहिले नाहीत. ना त्यांच्यावर बॉम्बवर्षाव होतो, त्यांना कधी नरसंहाराचा सामना करावा लागलेला नाही किंवा त्यांचे लोक अचानक बेपत्ता देखील होत



नाहीत".भारताने पाकिस्तानला पाकव्याप्त काश्मीरवरील ताबा सोडून तो प्रदेश रिक्त करण्यास सांगितलं आहे. भारताच्या या मागणीचं मीर यार बलोच यांनी समर्थन केलं आहे. तसेच त्यांनी पाकिस्तानी सरकारकडे मागणी केली आहे की त्यांनी पाकव्याप्त काश्मीर भारताला द्यावा. ते म्हणाले, "आंतरराष्ट्रीय समुदायाने पाकिस्तानला पाकव्याप्त काश्मीर सोडण्यास सांगावं. आम्ही भारताच्या निर्णयाचं पूर्णपणे समर्थन करतो. पाकिस्तानने भारताचं ऐकलं नाही तर १९७१ सारखी घटना पुन्हा पाहायला मिळू शकते. पाकिस्तानी लष्करप्रमुखांच्या मनातील लालसेमुळे पुन्हा एकदा ९३,००० पाकिस्तानी सैनिकांना भारतासमोर शरणागती पत्करावी लागू शकते. १९७१ ला ढाक्यात जे झालं तेच काश्मीरमध्ये होऊ शकतं. भारत पाकिस्तानी लष्कराला पराभूत करण्यास सक्षम आहे."मीर यार बलोच यांनी भारतासह जगभरातील देशांना आवाहन केलं आहे की त्यांनी बलुचिस्तानच्या स्वातंत्र्याला मान्यता द्यावी. बलुचिस्तान हे जबरदस्तीने आणि परकीय शक्तींच्या सहाय्याने पाकिस्तानात विलीन करण्यात आलं होतं. मात्र, आता आम्ही स्वतंत्र आहोत. जगानेही आमचं स्वातंत्र्य व सार्वभौमत्त्व मान्य करावं.मीर यार बलोच यांनी पाकिस्तानी सरकार व लष्कराला उद्देशून म्हटलं आहे की "तुम्ही आम्हाला माराल, तर आम्ही पुन्हा उभे राहू, आम्ही आमचा वंश वाचवण्यासाठी धडपडतोय, आम्हाला साथ द्या". पाकिस्तानने बेकायदेशीरपणे ताबा मिळवलेल्या बलुचिस्तानमधील बलोच लोक रस्त्यावर उतरले आहेत. बलुचिस्तान हा आता पाकिस्तानचा भाग नाही असा निर्णय त्यांनी घेतला आहे. जगाने डोळ्यावर पट्टी बांधून याकडे केवळ बघत बसू नये, असंही मीर यार यांनी म्हटलं आहे.बलोच नेत्याने भारतीय प्रसारमाध्यमं, युट्यूबर्स व बुद्धीजीवी लोकांना विनंती केली आहे की "आम्ही बलुची लोक आहोत. आम्ही पाकिस्तानी नाही. आम्हाला पाकिस्तानी म्हणणं थांबवा. पंजाबी लोक हे केवळ पाकिस्तानी आहेत. कारण त्यांनी कधी त्यांच्यावर हल्ले झालेले पाहिले नाहीत. ना त्यांच्यावर बॉम्बवर्षाव होतो, त्यांना कधी नरसंहाराचा सामना करावा लागलेला नाही.

### पंजाबी लोक हे केवळ पाकिस्तानी

भारताने पाकिस्तानला पाकव्याप्त काश्मीरवरील ताबा सोडून तो प्रदेश रिक्त करण्यास सांगितलं आहे. भारताच्या या मागणीचं मीर यार बलोच यांनी समर्थन केलं आहे. तसेच त्यांनी पाकिस्तानी सरकारकडे मागणी केली आहे की त्यांनी पाकव्याप्त काश्मीर भारताला द्यावा. ते म्हणाले, "आंतरराष्ट्रीय समुदायाने पाकिस्तानला पाकव्याप्त काश्मीर सोडण्यास सांगावं. आम्ही भारताच्या निर्णयाचं पूर्णपणे समर्थन करतो. पाकिस्तानने भारताचं ऐकलं नाही तर १९७१ सारखी घटना पुन्हा पाहायला मिळू शकते. पाकिस्तानी लष्करप्रमुखांच्या मनातील लालसेमुळे पुन्हा एकदा ९३,००० पाकिस्तानी सैनिकांना भारतासमोर शरणागती पत्करावी लागू शकते.

# तेलंगणा सीमेवर ३१ कुख्यात नक्षलवादी ठार

## राज्यांमधील नक्षलवादी संघटनांविरोधात मोठी मोहीम सुरू

। नवी दिल्ली । प्रतिनिधी : महाईन्यूज ।

केंद्र सरकारने छत्तीसगडसह देशभरातील वेगवेगळ्या राज्यांमधील नक्षलवादी संघटनांविरोधात मोठी मोहीम सुरू केली आहे. नक्षलवाद्यांविरोधातील आतापर्यंतची सर्वात मोठी कारवाई करण्यात सुरक्षा दलांना यश मिळालं आहे. छत्तीसगड-तेलंगणाच्या सीमेवरील कर्रेगुट्टालू हिल्सवर (केजीएच) सुरक्षा दलाची तुकडी व नक्षलवाद्यांमध्ये झालेल्या चकमकीत ३१ कुख्यात नक्षलवादी ठार झाले आहेत. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी एक्सवर एक पोस्ट करून या कारवाईची माहिती दिली आहे.



'नक्षलमुक्त भारत' या नक्षलवाद्यांचा बिमोड करण्यासाठी सुरक्षा दलांनी सुरू केलेल्या मोहिमेला मोठं यश मिळालं आहे. अलीकडच्या काही दिवसांत सुरक्षा दलांनी त्यांची नक्षलवाद्यांविरोधातील मोहीम अधिक तीव्र केली आहे. त्याचाच हा परिणाम असल्याचं बोललं जात आहे.अमित शाह यांनी त्यांच्या पोस्टमध्ये म्हटलं आहे की नक्षलमुक्त भारताच्या संकल्पात ऐतिहासिक यश मिळालं आहे. सुरक्षा दलांनी नक्षलवाद्यांविरोधात सुरू केलेल्या आतापर्यंतच्या सर्वात मोठ्या कारवाईदरम्यान छत्तीसगड व तेलंगणाच्या सीमेवरील कर्रेगुट्टालू हिल्सवर झालेली ही कारवाई आजवरची नक्षलवाद्यांविरोधातील सर्वात मोठी कारवी असल्याचं म्हटलं जात आहे.

शाह यांनी याबाबत केलेल्या त्यांच्या पोस्टमध्ये म्हटलं आहे की "नक्षलमुक्त भारत घडवणं हा आमचा संकल्प आहे. या संकल्पाला ऐतिहासिक यश मिळालं आहे. आपल्या सुरक्षा दलांनी नक्षलवाद्यांविरोधात सर्वात मोठी कारवाई केली आहे. छत्तीसगड-तेलंगणाच्या सीमेवरील कर्रेगुट्टालू हिल्समध्ये लपून बसलेल्या ३१ कुख्यात नक्षलवाद्यांना त्यांनी ठार केलं आहे. या कर्रेगुट्टालू हिल्सवर एके काळी लाल दहशतवादाचं राज्य होतं. येथे लाल दहशतवादाचं मळभ दाटलं होतं. मात्र, आज तिथे आपल्या भारताचा तिरंगा अभिमानाने फडकत आहे.

### 21 दिवसांची कारवाई

केंद्रीय गृहमंत्री म्हणाले, "कर्रेगुट्टालू टेकडी हे पीएलजीए बटालियन १, डीकेएसझेडसी, टीएससी व सीआरसीसारख्या प्रमुख नक्षलवादी संघटनांचं संयुक्त मुख्यालय होतं. या ठिकाणी नक्षलवाद्यांना प्रशिक्षण देण्याबरोबरच रणनिती आखणे, शस्त्रसाठा करणे अशा कारवाया केल्या जात होत्या. आपल्या सुरक्षा दलांनी त्यांच्या प्रमुख केंद्रावरच हल्ला केला. नक्षलवाद्यांविरोधातील ही सर्वात मोठी कारवाई आहे. ही कारवाई २१ दिवस चालली. या कारवाईदरम्यान ३१ कुख्यात नक्षलवादी ठार झाले.कर्रेगुट्टालू हिल्सवर नक्षलवाद्यांना प्रशिक्षण दिलं जायचं. 'नक्षलमुक्त भारत' या नक्षलवाद्यांचा बिमोड करण्यासाठी सुरक्षा दलांनी सुरू केलेल्या मोहिमेला मोठं यश मिळालं आहे.

# प्रीती झिंटाच्या बॉयफ्रेंडचा अपघातात झालेला मृत्यू



प्रीती झिंटा ही बॉलीवूडमधील यशस्वी अभिनेत्री म्हणून ओळखली जाते. १९९८ मध्ये अभिनेत्रीने बॉलीवूडमध्ये पदार्पण केले होते. 'दिल से' हा तिचा पहिला चित्रपट होता. 'दिल चाहता है', 'क्या कहना', 'ये रास्ते है प्यार के', 'फर्ज', 'चोरी चोरी चुपके चुपके', 'कोई मिल गया', अशा अनेक चित्रपटांसाठी अभिनेत्री ओळखली जाते. मात्र, तिचा 'कल हो ना हो' हा चित्रपट आजही लोकप्रिय आहे. या चित्रपटात शाहरुख खान, सैफ अली खान, जया बच्चन, सोनाली बेंद्रे असे अनेक कलाकार महत्वाच्या भूमिकेत होते.'कल हो ना हो' हा चित्रपटातील नैना, अमन व रोहित यांची ही गोष्ट प्रेक्षकांना भारावून टाकते. नैनाचे पहिले प्रेम अमनचे निधन झाले होते. त्यानंतर रोहित व नैना लग्न करतात. पण, त्यांच्या मनात अमनच्या आठवणी शेवटपर्यंत राहतात. अशा आशयाची गोष्ट पाहायला मिळाली. मात्र, चित्रपटातच नाही तर खऱ्या आयुष्यातही प्रीतीने तिचे पहिले प्रेम गमावले आहे. अभिनेत्रीने नुकतेच एक्स या सोशल मिडिया प्लॅटफॉर्मवर आस्क मी एनिथिंग हे सेशन घेतेले.यामध्ये एका चाहत्याने तिला विचारले की इतक्या वर्षांनंतरही ती 'कल हो ना हो' पाहताना प्रेक्षकांप्रमाणेच अजूनही रडते का? या प्रश्नाचे उत्तर देताना अभिनेत्रीने तिच्या आयुष्यातील एक हृदयस्पर्शी घटनादेखील सांगितली. अभिनेत्रीने लिहिले, "हो, मी हा चित्रपट पाहताना आजही रडते. या चित्रपटाचे जेव्हा आम्ही शूटिंग करत होतो त्यावेळी देखील मी रडले होते. माझे ज्या मुलावर प्रेम होते, त्याचा कार अपघातात मृत्यू झाला होता. माझे पहिले प्रेम गमावले आहे. त्यामुळे हा चित्रपट इतर चित्रपटापेक्षा वेगळा ठरतो." पुढे अभिनेत्रीने लिहिले, "गमतीची गोष्ट अशी की या चित्रपटाच्या अनेक सीनमध्ये सर्वच कलाकार खरोखरच रडत होते.

# रितेशकडून पत्नी जिनिलीयाचं कौतुक

अभिनेता रितेश देशमुख व जिनिलीया देशमुख ही बॉलीवूडमधील प्रसिद्ध जोडी आहे. महाराष्ट्रात हे दोघे लाडके दादा-वहिनी म्हणूनही ओळखले जातात. त्यामुळे या दोघांचा मोठा चाहतावर्ग आहे. या जोडीमध्ये एकमेकांबद्दल असलेलं प्रेम, आदर या गोष्टी प्रेक्षकांना विशेष भावतात. नेहमीच हे दोघे खंबीरपणे एकमेकांच्या मागे उभे असतात. एकमेकांच्या कलाकृतींना कायम पाठिंबा देत असतात. अशातच आता रितेशने नुकतीच सोशल मीडियावर पोस्ट करीत जिनिलीयाच्या 'सितारे जमीन पर' या चित्रपटाला पाठिंबा दिला आहे. एक्सवर आणि इन्स्टाग्रामवर त्यानं चित्रपटाच्या ट्रेलरचं आणि कलाकारांचं कौतुक केलं आहे. रितेशनं एक्सवर "असामान्य ट्रेलर.." असं लिहीत चित्रपटाच्या ट्रेलरचं कौतुक केलं होतं. काल (१३ मे) 'सितारे जमीन पर' या चित्रपटाचा ट्रेलर प्रदर्शित झाला. यावेळी अनेकांनी ट्रेलरचं कौतुक केलं. अशातच आज पुन्हा रितेशनं या चित्रपटाच्या ट्रेलरचं, तसेच त्याची पत्नी जिनिलीया व आमिर खानचं कौतुक केलं आहे.इन्स्टाग्रामवर 'सितारे जमीन पर' चित्रपटाचा ट्रेलर शेअर करीत तो म्हणाला, "हा चित्रपट कधी प्रदर्शित होतोय याची वाट बघत आहे.

# उर्वशी रौतेलाचा अतरंगी लूक



उर्वशी रौतेला कान्स २०२५ च्या उद्घाटन समारंभाच्या रेड कार्पेटवर मल्टीकलर फ्लोअर-लेंथ गाऊन घालून आली. पण, तिच्या लूकपेक्षाही सगळ्यांचे लक्ष वेधून घेणारी गोष्ट म्हणजे उर्वशीचा पॅरट क्लच. उर्वशीने मल्टीकलर स्टोन स्टडेड टियारा आणि एक अनोखा क्लच कॅरी केला होता. अभिनेत्रीचा हा क्लच लाखो रुपयांचा आहे. दी इंडियन एक्स्प्रेसमध्ये प्रकाशित झालेल्या वृत्तानुसार, या क्लचची किंमत सुमारे ४.७ लाख रुपये आहे.इन्स्टाग्राम पेज डायट सब्यानुसार, उर्वशीने कॅरी केलेला पॅरट क्लच डिझायनर ज्युडिथ लीबरचा आहे आणि त्याची किंमत सुमारे ४.६८ लाख रुपये आहे. कान्समध्ये तिने हा क्लच कॅरी केला, जणू काही पाळीव पोपट हातात धरला आहे. उर्वशीने तिच्या लूकपेक्षाही तिचा क्लच कॅमेऱ्यासमोर जास्त प्रमाणात दाखवला. उर्वशीने हे पॅरट क्लच हातात घेऊन सुंदर अशा पोज दिल्या.उर्वशीच्या ड्रेसबद्दल बोलायचे झाले, तर तिच्या लॉंग गाऊनच्या मागच्या बाजूला एक लांब ट्यूल होता. उर्वशीचा मेकअप लूक खूपच ग्लॉसी आणि सुंदर होता. ती या आउटफिटमध्ये खूपच सुंदर दिसत होती. उर्वशीच्या लूकवर वापरकर्त्यांनी प्रतिक्रिया दिल्या आहेत. एका वापरकर्त्याने लिहिले, "सो ब्यूटीफुल, सो एलिगेंट, जस्ट लुकिंग लाइक अ डिझाईन मशीन स्टूडिओ". दुसऱ्या वापरकर्त्याने लिहिले, "उर्वशीने ऐश्वर्याचा लूक खराब केला." एका व्यक्तीने लिहिले, "तिचा मेकअप अनेकांना आवडला नाही, ती जोकर दिसत आहे. एका युजरने उर्वशीला, "ओव्हरड्रेसिंग, ओव्हर मेकअप, ओव्हरॲक्टिंग", असे म्हटले आहे.उर्वशीचा क्लच चर्चेत असला तरी, तिच्या आऊटफिटला खूप ट्रोल केले जात आहे. हा आऊटफिट पाहून अनेक वापरकर्त्यांना ऐश्वर्या रायच्या २०१८ च्या कान्स लूकची आठवण झाली आहे. ऐश्वर्याच्या त्या लूकची खूप प्रशंसा झाली होती आणि आजही तो तिच्या सर्वोत्तम लूकपैकी एक मानला जातो. अभिनेत्री उर्वशी रौतेलाच्या कामाबद्दल बोलायचे झाले तर, ती शेवटची दक्षिण भारतीय चित्रपट 'डाकू महाराज'मध्ये दिसली होती. चित्रपटातील एका डान्स स्टेपसाठी अभिनेत्रीला टीकेचा सामना करावा लागला. अलीकडेच ती सनी देओलच्या 'जाट' चित्रपटातील 'टच किया' गाण्यात दिसली. त्याशिवाय उर्वशी 'वेलकम टू द जंगल' व 'कसूर २'मध्ये दिसणार आहे.

# आजकल तेरे मेरे प्यार के चर्चे

'ठरलं तर मग' मालिका 'स्टार प्रवाह' वाहिनीवर ५ डिसेंबर २०२२ रोजी प्रेक्षकांच्या भेटीला आली. गेल्या अडीच वर्षात या मालिकेने सर्वांच्या मनावर अधिराज्य गाजवलं आहे. या शोमधले सगळेच कलाकार आता घराघरांत लोकप्रिय झाले आहेत. याशिवाय टीआरपीच्या शर्यतीत देखील ही मालिका प्रत्येक आठवड्यात पहिल्या स्थानावर विराजमान असते. नुकताच या मालिकेने आठशे भागांचा टप्पा गाठला आहे. 'ठरलं तर मग' मालिकेचे ८०० भाग पूर्ण झाल्याच्या निमित्ताने सध्या सर्व स्तरांतून या मालिकेवर कौतुकाचा वर्षाव करण्यात येत आहे. मालिकेची नायिका जुई गडकरी, मुख्य अभिनेता अमित भानुशाली, प्राजक्ता दिघे, दिशा दानडे अशा सगळ्याच कलाकारांनी या मालिकेला दिलेल्या प्रेमाबद्दल प्रेक्षकांचे आभार मानले आहेत. पण, या सगळ्यात पूर्णा आजींनी मालिकेच्या सेटवर केलेलं सेलिब्रेशन सर्वत्र चर्चेत आलं आहे.'ठरलं तर मग' मालिकेत पूर्णा आजीची भूमिका ज्येष्ठ अभिनेत्री ज्योती चांदेकर साकारत आहेत. आज वयाच्या ६८ व्या वर्षी देखील पूर्णा आजी सेटवर कायम उत्साही असतात. मालिकेचे आठशे भाग पूर्ण होताच पूर्णा आजींनी आनंदी होऊन सेटवर स्क्रिप्ट वाचताना धमाल सेलिब्रेशन केल्याचं पाहायला मिळालं. मोहम्मद रफी यांच्या "आजकल तेरे मेरे प्यार के चर्चे..." या गाण्यावर पूर्णा आजीने ठेका धरला होता. याचा खास व्हिडीओ जुईने गडकरीने शेअर केला आहे.

# 'नवरी मिळे हिटलरला' : अन् अंतरा लीलाच्या कानाखाली देणार

'नवरी मिळे हिटलरला' या मालिकेतील एजे व लीला यांची जोडी सध्या धुमाकूळ घालताना दिसत आहे. या मालिकेत सध्या नवनीवन ट्विस्ट आले आहेत. आता मालिकेचा नवीन प्रोमो लक्ष वेधून घेत आहे.झी मराठी वाहिनीने सोशल मीडियावर 'नवरी मिळे हिटलरला' मालिकेचा प्रोमो शेअर केला आहे. या प्रोमोमध्ये पाहायला मिळते की, एजे ऊर्फ अभिराम व अंतरा यांच्यामध्ये संवाद सुरू आहे. अंतरा एजेला म्हणते, "अभिराम, तुझ्यावर फक्त माझा नि माझाच हक्क आहे." तितक्यात लीला खोलीत येते आणि अभिरामला म्हणते, "एजे, अंतराताई बरोबर बोलत आहेत. तुम्ही त्यांचेच आहात."लीलाचे बोलणे ऐकूण एजेला धक्का बसतो. तो लीलाला म्हणतो, "लीला, तू हे काय बोलतेस हे तुला कळतंय का?", असे म्हणत तो लीलाकडे जात असतो. तितक्यात अंतरा त्याला थांबवते. ती त्याला म्हणते, "तुझी व लीलाची साथ इथपर्यंतच होती. आता मला माझ्या वाटेचं प्रेम मिळायला हवं". त्यावर एजे म्हणतो, "अंतरा हे शक्य नाहीये", अंतरा त्याला प्रतिप्रश्न विचारते, "हे का शक्य नाहीये?"प्रोमोमध्ये पुढे पाहायला मिळते की, अंतरा लीलाला हाताला धरून बाहेर काढण्याचा प्रयत्न करते. लीला एजेशी बोलण्याचा प्रयत्न करते; पण तितक्यात अंतरा तिला कानाखाली देते. त्यावर एजे मोठ्याने अंतरा, असे म्हणतो. हा प्रोमो शेअर करताना झी मराठी वाहिनीने, 'अंतरा लीलावर हात उचलणार?' अशी कॅप्शन दिली आहे.आता हा प्रोमो पाहिल्यानंतर अनेक नेटकऱ्यांनी कमेंट्स केल्या आहेत. एका नेटकऱ्याने म्हटले, "लीलाचं स्वप्न असेल". दुसऱ्या एका नेटकऱ्याने लिहिले, "बिचारी लीला". आणखी एका नेटकऱ्याने लिहिले, "नक्की हे कोणाचं ना कोणाचं तरी स्वप्न आहे". एका नेटकऱ्याने लिहिले, "स्वप्न असेल, असे वाटते". आणखी एका नेटकऱ्याने लिहिले, "हे नक्की लीलाचं स्वप्न आहे". अनेक नेटकऱ्यांनी हे स्वप्न असल्याचा अंदाज व्यक्त केला आहे.नवरी मिळे हिटलरला या मालिकेत दाखविल्याप्रमाणे, अंतरा ही एजेची पहिली पत्नी आहे. एका अपघातात तिचे निधन झाल्याचे जहागीरदार कुटुंबाला समजले.

# अष्टपैलू रवींद्र जडेजाचा वर्ल्ड रेकॉर्ड!

## कसोटीत अनोखी कामगिरी करणारा जगातील पहिलाच खेळाडू

**। नवी दिल्ली। प्रतिनिधी : महाईन्यूज ।**

**भारताचे सिनियर खेळाडू विराट कोहली आणि रोहित शर्मने कसोटीमधून निवृत्ती अचानक जाहीर केली. त्यामुळे सध्या हे दोन्ही खेळाडू चर्चेचा विषय ठरले आहेत. तर काही चाहते यादरम्यान म्हणतायत की रवींद्र जडेजाने तरी निवृत्ती जाहीर करू नये. यामागचं कारण म्हणजे भारताने टी-२० विश्वचषक २०२४ जिंकल्यानंतर या तिन्ही खेळाडू एकामागून एक निवृत्ती जाहीर केली होती. पण ही चर्चा सुरू असतानाच रवींद्र जडेजाने कसोटीमध्ये इतिहास रचला आहे.**




रवींद्र जडेजाने कसोटी क्रिकेटमध्ये असा इतिहास घडवला आहे जो यापूर्वी कधीही कोणत्याच खेळाडूला जमला नाही. आयसीसीने नवी कसोटी क्रमवारी जाहीर केली आहे. या नव्या कसोटी क्रमवारीत रवींद्र जडेजा अष्टपैलू खेळाडूंच्या यादीत रवींद्र जडेजा पहिल्या स्थानावर आहे. जडेजा सर्वाधिक ४०० गुणांसह पहिल्या स्थानी आहे.आयसीसीच्या अष्टपैलू खेळाडूंच्या ताज्या कसोटी क्रमवारीत रवींद्र जडेजा अजूनही पहिल्या क्रमांकावर आहे. बऱ्याच काळापासून, जगातील कोणताही अष्टपैलू खेळाडू जडेजाकडून हा पहिल्या क्रमांकाचा ताज हिसकावून घेऊ शकलेला नाही. कसोटी अष्टपैलू खेळाडूंच्या क्रमवारीत दीर्घकाळ पहिल्या स्थानावर राहणारा जडेजा आता जगातील पहिला खेळाडू बनला आहे.जडेजा हा २०२२ पासून म्हणजेच ११५१ दिवसांपासून कसोटी क्रमवारीत पहिल्या स्थानावर आहे. याशिवाय बांगलादेशचा मेहदी हसन मिराज ३२७ रेटिंग गुणांसह यादीत दुसऱ्या स्थानावर आहे. ९ मार्च २०२२ रोजी रवींद्र जडेजा वेस्ट इंडिजच्या जेसन होल्डरला मागे टाकून जगातील पहिल्या क्रमांकाचा कसोटी अष्टपैलू खेळाडू ठरला. तेव्हापासून ३८ महिने झाले आहेत, रवींद्र जडेजा ११५१ दिवसांनंतरही सतत पहिल्या क्रमांकावर आहे.२०२२ मध्ये जेव्हा रवींद्र जडेजा जगातील नंबर वन टेस्ट अष्टपैलू खेळाडू बनण्याचा मान दुसऱ्यांदा पटकावला होता. कारण त्याआधी, तो ऑगस्ट २०१७ मध्ये एका आठवड्यासाठी पहिल्या क्रमांकावर कायम होता. ताज्या कसोटी अष्टपैलू क्रमवारीत अव्वल स्थान कायम ठेवण्यासाठी, रवींद्र जडेजाची स्पर्धा बांगलादेशच्या मेहदी हसन मिराजशी होती, ज्याचे ३२७ रेटिंग गुण आहेत. नवीन क्रमवारीत, मेहदी हसनने मार्को यान्सनला मागे टाकत दुसरे स्थान पटकावले आहे.पॅट कमिन्स हा अष्टपैलू खेळाडूंच्या यादीत चौथ्या स्थानी आहे. तर बांगलादेशचा शाकिब अल हसन पाचव्या स्थानावर आहे. जडेजा वगळता टॉप १० मध्ये दुसरा कोणताही भारतीय अष्टपैलू खेळाडू नाही. त्याच्यानंतर, अक्षर पटेल कसोटी अष्टपैलू खेळाडूंच्या यादीत १२ व्या क्रमांकावर आहे.रवींद्र जडेजाने कसोटी क्रिकेटमध्ये असा इतिहास घडवला आहे जो यापूर्वी कधीही कोणत्याच खेळाडूला जमला नाही. आयसीसीने नवी कसोटी क्रमवारी जाहीर केली आहे. या नव्या कसोटी क्रमवारीत रवींद्र जडेजा अष्टपैलू खेळाडूंच्या यादीत रवींद्र जडेजा पहिल्या स्थानावर आहे. जडेजा सर्वाधिक ४०० गुणांसह पहिल्या स्थानी आहे.जगातील कोणताही अष्टपैलू खेळाडू जडेजाकडून हा पहिल्या क्रमांकाचा ताज हिसकावून घेऊ शकलेला नाही. कसोटी अष्टपैलू खेळाडूंच्या क्रमवारीत दीर्घकाळ पहिल्या स्थानावर राहणारा जडेजा आता जगातील पहिला खेळाडू बनला आहे.

### जडेजा 400 गुणांसह पहिल्या स्थानी

जडेजा हा २०२२ पासून म्हणजेच ११५१ दिवसांपासून कसोटी क्रमवारीत पहिल्या स्थानावर आहे. याशिवाय बांगलादेशचा मेहदी हसन मिराज ३२७ रेटिंग गुणांसह यादीत दुसऱ्या स्थानावर आहे. ९ मार्च २०२२ रोजी रवींद्र जडेजा वेस्ट इंडिजच्या जेसन होल्डरला मागे टाकून जगातील पहिल्या क्रमांकाचा कसोटी अष्टपैलू खेळाडू ठरला. तेव्हापासून ३८ महिने झाले आहेत, रवींद्र जडेजा ११५१ दिवसांनंतरही सतत पहिल्या क्रमांकावर आहे.२०२२ मध्ये जेव्हा रवींद्र जडेजा जगातील नंबर वन टेस्ट अष्टपैलू खेळाडू बनण्याचा मान दुसऱ्यांदा पटकावला होता. कारण त्याआधी, तो ऑगस्ट २०१७ मध्ये एका आठवड्यासाठी पहिल्या क्रमांकावर कायम होता. ताज्या कसोटी अष्टपैलू क्रमवारीत अव्वल स्थान कायम ठेवण्यासाठी, रवींद्र जडेजाची स्पर्धा बांगलादेशच्या मेहदी हसन मिराजशी होती, ज्याचे ३२७ रेटिंग गुण आहेत. नवीन क्रमवारीत, मेहदी हसनने मार्को यान्सनला मागे टाकत दुसरे स्थान पटकावले आहे.पॅट कमिन्स हा अष्टपैलू खेळाडूंच्या यादीत चौथ्या स्थानी आहे.

---

# दिल्लीच्या खेळाडूचा भारतात परतण्यास नकार!

## 6 कोटी मोजून बांगलादेशच्या 'या' खेळाडूला दिलं संघात स्थान

**। नवी दिल्ली । प्रतिनिधी : महाईन्यूज ।**

**आयपीएल २०२५ स्पर्धेतील उर्वरीत सामन्यांना येत्या १७ मेपासून सुरूवात होणार आहे. तर स्पर्धेतील फायनलचा सामना ३ मे रोजी खेळवला जाणार आहे. मात्र, अजूनही प्लेऑफमध्ये जाणारे ४ संघ कोणते? हे अजूनही कळू शकलेलं नाही.**



अक्षर पटेलच्या नेतृत्वाखाली खेळणाऱ्या दिल्ली कॅपिटल्स संघासाठी प्लेऑफची दारं उघडी आहेत. दरम्यान दुसऱ्या टप्प्यातील सामन्यांना सुरूवात होण्यापूर्वी दिल्ली कॅपिटल्सला मोठा धक्का बसला आहे. स्टार फलंदाज या हंगामातून बाहेर पडला आहे.त्याच्या जागी बदली खेळाडूची घोषणा देखील करण्यात आली आहे. आयपीएल २०२५ स्पर्धेतील दुसऱ्या टप्प्यातील सामने सुरू होण्यापूर्वी दिल्ली कॅपिटल्स संघासाठी टेन्शन वाढवणारी बातमी समोर आली आहे. विस्फोटक फलंदाज जेक फ्रेजर मॅकगर्क या हंगामातून बाहेर पडला आहे. त्याच्या जागी बदली खेळाडू म्हणून बांगलादेशचा डावखुऱ्या हाताचा वेगवान गोलंदाज मुस्तफिजुर रहमानला संघात स्थान देण्यात आलं आहे. माध्यमातील वृत्तानुसार, त्याला ६ कोटी देऊन संघात स्थान दिलं गेलं आहे. दिल्ली कॅपिटल्सच्या अधिकृत सोशल मीडिया अकाऊंटवरून याबाबत माहिती दिली गेली आहे. मुस्तफिजुर रहमान संघात आल्यामुळे दिल्ली कॅपिटल्सची ताकद दुपटीने वाढली आहे. इथून पुढील सामने दिल्लीसाठी अतिशय महत्वाचे असणार आहेत.जेक फ्रेजर मॅकगर्क संघातून बाहेर पडणं हा दिल्लीसाठी मोठा धक्का आहे. कारण त्याने संघासाठी महत्वपूर्ण धावा केल्या आहेत. तर दुसरीकडे मुस्तफिजुर रहमान दोन वर्षांनंतर आयपीएलमध्ये पुनरागमन करणार आहे. मुस्तफिजुर रहमानच्या टी-२० आंतरराष्ट्रीय कारकिर्दीबद्दल बोलायचं झालं, तर त्याला आतापर्यंत १०६ सामने खेळण्याची संधी मिळाली आहे. यादरम्यान त्याने १३२ गडी बाद केले आहेत. यादरम्यान १० धावा खर्च करून ६ गडी बाद ही त्याची सर्वोत्तम कामगिरी आहे. तर त्याच्या आयपीएल स्पर्धेतील कामगिरीबद्दल बोलायचं झालं, तर त्याला ५७ सामने खेळण्याची संधी मिळाली आहे. यादरम्यान त्याने ६१ गडी बाद केले आहेत.तर २९ धावा खर्च करून ४ गडी बाद ही त्याची सर्वोत्तम कामगिरी आहे. आतापर्यंत दिल्ली कॅपिटल्ससाठी मिचेल स्टार्कने ही जबाबदारी पार पाडली होती.

### प्लेऑफ गाठण्याची संधी

अक्षर पटेलच्या नेतृत्वाखाली खेळणाऱ्या दिल्ली कॅपिटल्सला प्लेऑफमध्ये प्रवेश करण्याची सुवर्णसंधी आहे. हा संघ सध्या गुणतालिकेत पाचव्या स्थानी आहे. दिल्लीने आतापर्यंत ११ सामने खेळले आहेत. यादरम्यान या संघाला ६ सामने जिंकता आले आहेत. तर ४ सामन्यांमध्ये पराभवाचा सामना करावा लागला.

स्मार्ट PCMC SMART CITY

महाईन्यूज™

ePaper

epaper.mahaenews.com

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

।गुरुवार।
।दि. 15 मे 2025।

### 275 विद्यार्थ्यांपैकी 106 विद्यार्थ्यांनी 91 टक्क्यांपेक्षा जास्त गुण मिळवले

# एस. बी. पाटील स्कूलच्या विद्यार्थ्यांचे घवघवीत यश!

## शिक्षण विश्व: दहावी आणि बारावीच्या निकालात मुलींची आघाडी

**।पिंपरी- चिंचवड ।प्रतिनिधी : महाईन्यूज ।**

**विद्यार्थिनींचा आणि समाजातील वंचित घटकांचा आत्मविश्वास वाढवण्यासाठी निर्भय कन्या अभियान मोठ्या प्रमाणात राबविण्यात आले पाहिजे. यामुळे महिलांचे मनोबल आणि आत्मविश्वास वाढेल. त्यातून त्यांचे व्यक्तिमत्व विकसित होऊन त्या सक्षम नागरिक म्हणून काम करतील, हाच निर्भय कन्या अभियानाचा मुख्य उद्देश आहे असे एसबीपीआयएमच्या संचालिका डॉ. किर्ती धारवाडकर यांनी सांगितले.**








पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या रावेत येथील एस. बी. पाटील पब्लिक स्कूल मधील सीबीएससी बोर्डाचा इयत्ता दहावी आणि बारावी २०२४-२५ या वर्षातील एकूण. पहिले पाच क्रमांक मुलींनी मिळवले आहेत. दहावी मध्ये प्रथम क्रमांक आकांक्षा फाकटकर ९९ टक्के, द्वितीय क्रमांक अमिता नेरलीकर ९८.४ टक्के, तृतीय क्रमांक तनिष्का झा ९८.२ टक्के, चौथा क्रमांक आरोही निकम ९८ टक्के आणि पाचवा क्रमांक पर्णिका अभंग ९७.८० टक्के यांचा समावेश आहे.

आकांक्षा फाकटकर हिने मराठी, अमिता नेरलीकर हिने संस्कृत, तनिष्का झा हिने गणित विषयात शंभर पैकी शंभर गुण मिळवले आहेत.

बारावी मध्ये आर्या कुलकर्णी हिने ९३.६ टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक मिळवला आहे. मुदीत सराफ ९३.२ टक्के द्वितीय क्रमांक, लावण्या एरंडे ८६.४ टक्के, चतुर्थ क्रमांक प्रेक्षा कपूर ८६ टक्के आणि पाचवा क्रमांक यशश्री शहा ८५.६ टक्के गुण मिळवून यश संपादन केले आहे.

तसेच माहिती तंत्रज्ञान विषयात ४० विद्यार्थ्यांनी १०० गुण १८ विद्यार्थ्यांनी ९९ गुण मिळवले आहेत. आर्थिक व्यवस्थापन विषयात १३ विद्यार्थ्यांना १०० गुण ५ विद्यार्थ्यांना ९९ गुण मिळाले आहेत.

प्राचार्या डॉ. बिंदू सैनी, उपप्राचार्या पद्मावती बंडा, मुख्याध्यापिका शुभांगी कुलकर्णी यांचे आणि यशस्वी विद्यार्थ्यांचे पीसीईटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्षा पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त तथा पीसीयुचे कुलपती हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांनी अभिनंदन केले व शुभेच्छा दिल्या.


# मास्टर माईंड ग्लोबल स्कूल आणि ज्युनियर कॉलेजचे यश

## शिक्षण विश्व : दहावी आणि बारावी बोर्डाच्या परीक्षेच्या यशामध्ये मानाचा तुरा

**।पिंपरी-चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज ।**

**विद्यार्थ्यांच्या आयुष्याचा टर्निंग पॉईंट ठरणाऱ्या दहावी बोर्ड परीक्षेचा निकाल जाहीर झाला. बारावी पाठोपाठ दहावी बोर्ड परीक्षेतही मास्टर माईंड ग्लोबल स्कूल आणि ज्युनिअर कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी बाजी मारली आहे.**






सी.बी.एस.सी बोर्ड परीक्षा २०२४- २५ मध्ये १००% निकाल मिळवल्याबद्दल इयत्ता दहावी आणि बारावीच्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन करण्यात आले. दरवर्षीप्रमाणे या वर्षीही मास्टर माईंड स्कूल मधील विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले आहे. बारावी गुणवंत विद्यार्थ्यांची नावे खालीलप्रमाणे - विहान मिश्रा :-९६.२ %, शमन राय :- ९६% ,श्रावणी जाधव :- ९५.६ % तसेच ३३ विद्यार्थ्यांनी ९०% पेक्षा जास्त गुण मिळवले.

**10वी गुणवंत विद्यार्थ्यांची नावे खालीलप्रमाणे-**

उज्वल विश्वकर्मा- ९७.४%,
तेजस परमार - ९७.४%,
अनिरुद्ध पुरी- ९३.८%,
श्रेयस दांगट - ९३.४ %

तसेच ३४ विद्यार्थ्यांनी ९०% पेक्षा जास्त गुण मिळवले. सी.बी.एस.सी बोर्ड परीक्षेत परिश्रमाची कास धरून उत्तुंग यश गाठण्यासाठी सदैव मार्गदर्शन करणाऱ्या सर्व शिक्षकांचे आणि विद्यार्थ्यांचे डॉ. प्रदीपा नायर यांनी अभिनंदन केल.


ADMISSION OPEN
Moraya Shikshan Sanstha
"यत् भावो – तत् भवति"
Computer 15 days Crash Course
Our Courses
> PowerPoint with animation
> Basic Excel
> Corel Draw
> Adobe Photoshop
> Scratch Animation
> 'C' Language
> Basic Java
> Basic Tally
From
26th May 2025
1 Hour /day
Monday to Saturday
Contact
8087706100
Registration started
Venue: Computer Lab,
V. K. Mate Highschool

## इयत्ता दहावी मध्ये विद्यार्थ्यांचे घवघवीत यश

# न्यू इंग्लिश मीडियम स्कूलचा शंभर टक्के निकाल!

### शिक्षण विश्व: विद्यार्थ्यांचे शाळेकडून कौतुक

। पिंपरी- चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**न्यू इंग्लिश मीडियम स्कूल थेरगाव शाळेने 100 टक्के निकालाची परंपरा यंदाच्या वर्षी देखील विद्यार्थ्यांनी अखंडित ठेवली आहे.**















पहिले पाच विद्यार्थी वैभवी मंडलिक (92.40%), समीक्षा वाघमारे (91.80%), क्षितिजा जावीर (91.00%), सुजित चौबे ( 90.80%), हर्षदा जाधव (90.40%), यांनी घवघवीत यश मिळवले आहे.

यावर्षी इयत्ता दहावी मध्ये एकूण 76 विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली होती. यामध्ये 90 %पेक्षा जास्त गुण घेतलेले पाच विद्यार्थी 80% पेक्षा जास्त गुण घेतलेले 21 विद्यार्थी आहेत.70% जास्त गुण घेतलेले 26 विद्यार्थी आहेत. 60% जास्त गुण घेतलेले 16 विद्यार्थी आहेत.व 50 % जास्त गुण घेतलेले आठ विद्यार्थी आहेत.

शाळेच्या उत्कृष्ट निकालाबद्दल सर्व पालक वर्ग तसेच थेरगाव, रहाटणी, डांगेचौक परिसरात शाळेत शाळेचे नाव लौकिक झालेला आहे. उत्तीर्ण सर्व विद्यार्थ्यांना शाळेचे सर्व पदाधिकारी शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी सर्वांकडून शुभेच्छा देण्यात आल्या.

---

## एसपीजी इंटरनॅशनल पब्लिक स्कूलचा गुणवत्तापूर्ण निकाल

### शिक्षण विश्व : विद्यार्थ्यांमुळे शाळेच्या नावलौकिकात भर

। पिंपरी-चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**एसपीजी इंटरनॅशनल पब्लिक स्कूलच्या विद्यार्थ्यांनी दहावीच्या परीक्षेत घवघवीत यश मिळवले.विद्यार्थ्यांच्या गुणवत्तापूर्ण निकालामुळे शाळेच्या नावलौकिकात भर पडली असल्याचे कौतुक शाळेच्या वतीने करण्यात आले आहे.**

यंदाच्या वर्षी अनुष्का तापकीर (९६%),एकवीरा कोळी (९४%) वैष्णवी देय (९३.८%) ,समीक्षा लाड (९३.६%), शरवणी महाजन (९२.४%) या मुलींनी बाजी मारली आहे. या गुणवत्तापूर्ण निकालामध्ये विद्यार्थ्यांसोबत शाळेचे शिक्षक वर्ग तसेच मुख्याध्यापक यांचा मोलाचा वाटा आहे असे शाळा व्यवस्थापनाने म्हटले आहे.

**SPG INTERNATIONAL PUBLIC SCHOOL & Jr. College**
S.No-203, Near Durwankur Lawns, Alandi Road, Bhosari, Pune-411039.
Email : spgschoolbhosari@gmail.com Contact:-8237065094/96)
(Affiliated to Central Board of Secondary Education, Affiliation No. 1130741)

**SCHOOL TOPPERS**


ANUSHKA TAPKIR
96%


EKVEERA KOLI
94%


VAISHNAVI DEY
93.8 %


SAMIKSHA LAD
93.6 %


SHARWANI MAHAJAN
92.4 %

## इयत्ता दहावी मध्ये विद्यार्थ्यांचे घवघवीत यश

# शिवभूमीची 100 टक्के निकालाची परंपरा कायम!

### शिक्षण विश्व: विद्यालयातील सर्व विद्यार्थी उत्तीर्ण

। पिंपरी- चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**दहावीच्या बोर्ड परीक्षेत शिवभूमी विद्यालय यमुनानगर निगडी या विद्यालयाने शंभर टक्के निकालाची परंपरा कायम राखली आहे.**



विद्यालयातील 124 विद्यार्थी परीक्षेस बसले होते. एकूण सर्व विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून विद्यालयाचा शंभर टक्के निकाल लागला आहे.

यामध्ये प्रथम क्रमांक: गायकवाड जयंत सुनील 98%. द्वितीय क्रमांक: पाटील श्रावणी गौडाप्पा 95.40%, तर गायकवाड पियुष विकास 92.80. टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांक पटकावला. शिवभूमी शिक्षण मंडळाचे अध्यक्ष ज्ञानेश्वर कोंडे तसेच सहसचिव संग्राम दादा कोंडे तसेच शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती कवटे मॅडम यांनी विद्यार्थ्यांचे भरभरून कौतुक केले.

## रक्तदान शिबिराला तरुणांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

### विधायक उपक्रम; महापालिकेच्या आवाहनाला तरूणांकडून प्रतिसाद

। पिंपरी-चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**भोसरी हुतात्मा चौक येथे श्री. म्हसोबा देवस्थान मित्र मंडळ व शंभूराजे राज्याभिषेक सोहळा समिती राजधानी रायगड यांच्यावतीने धर्मवीर छत्रपती संभाजी राजे जयंती निमित्त रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.**




जम्मू काश्मीर येथील पहेलगाम हल्ल्यानंतर नागरिक तसेच भारतीय जवानांसाठी रक्ताची गरज भासू शकते या दक्षतेसाठी पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने रक्तदानासाठी आवाहन करण्यात आले होते. या आव्हानाला प्रतिसाद देत रक्तदान शिबिराला तरुणांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. संभाजी महाराज जयंती निमित्त म्हसोबा देवस्थान मंदिर हनुमान कॉलनी ४ हुतात्मा चौक भोसरी येथे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले.

पिंपरी चिंचवड ब्लड बँक यांच्या सहकार्याने रक्तसंकलन करण्यात आले. या शिबिरादरम्यान 25 रक्त पिशव्यांचे संकलन करण्यात आले. या शिबिरासाठी परिसरातील किरण भालेकर, दर्शन भुजबळ, स्वप्नील होरे, वरून गोरडे, स्वराज कराळे, ओंकार जगताप,तेजस गायकवाड,आयुष बाणेकर विशेष सहकार्य केले.